

सुकेशा
कुंतलोत्न
(रजिस्टर्ड.)
अत्यंत केशवर्धक पण
गदीं बिनधोक, मेदूस
तिदायक व पोषक.
केल्व्हिन केमिकल कं.
मुंबई.४.

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

# भावनातरंग



REFBK-0003728


सौ. इंदिरा तेलंग

# दृष्टी मुळेंच सृष्टी.

आयुष्य समाधानकारक घालविण्यासाठीं नजर साफ असावी लागते. कोणत्याही कारणामुळें तुमच्या डोळयांस त्रास होत असेल तर—

## सर्वांच्या खात्रीचे आणि विश्वासू

# चष्म्यांचे व्यापारी



## आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्,

यांच्या येथें डोळयांच्या हॉस्पिटल्मध्यें काम करणाऱ्यां तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून घ्या.


## उत्तम माल व माफक दर

(१) २०७, गिरगांव रोड.
(२) चामारबाग, पोयबावडी मुंबई, १२.
(३) रानडे रोड, दादर.
(४) शिवाजी चौक, कल्याण.
(५) खडे बाजार, बेळगांव.

सुधारणेच्या .... पण
काटकसरीच्या
काळांत—

Eastern's QUALITY

खालील माल **ईस्टर्न**
कडेच घेणें फायदेशीर
पडेल !



सोल पातळ...पण
टिकाऊ असेच
स्लिपर्स—
सुबक बांधणी,
वजनांत हलके
पण मोहक असे
त्रिगुण संपन्न सर्व
तऱ्हेचे शूज—
तसेच
मनमोहक डिझा-
इनच्या चंपल्स—
भेटी दाखल देण्यालायक
मनिपर्सेस मोठ्या
प्रमाणांत बनाविणार
व विकणार

टे. नं. ४१४०२

शोरूमः—**इस्टर्न लेदर वर्क्स** ४३९–४१ सॅन्डहर्स्ट रोड,
वनॉम हॉल लेन समोर, मुंबई नं. ४.
कारखानाः—धारावी.

# के. ए. पराडकर आणि कं.

## केमिस्ट ड्रगिस्टस्

गिरगांवरोड
फोन नं. २१८५२

सँढर्स्टरोड
फोन नं. ४१०१३

प्रिस्क्रिप्शन्स-
प्रमाणें माफक
दरांत औषधें
तयार करून
मिळतात.

दवाखान्यास लागणारें सर्व प्रकारचें
सामान व पेटंट औषधें मिळतात.

आमचेकडे स्टेशनरी, कट्लरी, टॉयलेटस,
क्रॉकरी, सर्व तऱ्हेचे खेळाचें सामान, प्रेझें-
टेबल फॅन्सी आर्टिकल्स, त्याचप्रमाणें
संसारोपयोगी शेगड्या वगैरे लोखंडी
सामान माफक भावानें मिळेल.

*एक वेळ येऊन खात्री करून घ्या.*

# दादर स्वस्तिक स्टोअर्स,

## रानडे रोड, दादर.

# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

**[ स्थापना १९१८ ]**

**सभासदः**—सारस्वत ज्ञातींतील कोणाही स्त्रीपुरुषास ( मुंबईत राहणारा असो वा नसो ) सभासद होतां येईल. प्रत्येक सभासदानें दहा रुपयांचा निदान एक शेअर घेतला पाहिजे; परंतु एका सभासदाला ३०० पेक्षां अधिक शेअर मिळणार नाहींत.

**शेअर्सः**—प्रत्येक शेअर दहा रुपयांचा आहे. शेअरवर १९२३ पासून दरसाल द. शें. ६। प्रमाणें डिव्हीडंड वाटण्यांत आलें आहे. शेअर खरेदी करण्याचे अर्ज ऑफिसांत मिळतील.

**मुदतीच्या ठेवीः**—रु. १०० अगर अधिक रकमांच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. बारा महिने मुदतीच्या ठेवीवर सभासदांना द. सा. दर शेंकडा ३ व इतरांना २॥ प्रमाणें व्याज दिलें जातें.

**सेव्हिंग्जडिपॉझीटः**—ह्या खात्यांत रु. ५ पासून रु. ५००० पर्यंत ठेवी स्वीकारल्या जातात. व्याज सभासदांना द. सा. दर शेंकडा २॥ प्रमाणें व इतरांना २ प्रमाणें दिलें जातें. पैसे **चेकानीं काढण्याची सोय केली आहे.**

**रिकरिंग डिपॉझिटः**—दरमहा १ रु. प्रमाणें सतत २४ महिने पैसे भरल्यास दोन वर्षांचे अखेर रु. २५ दिले जातात. व वरीलप्रमाणें ४५ महीने भरल्यास ४८ महिन्याच्या अखेरीस रु. ५० दिले जातात. म्हणजे व्याज सुमारें ५ टक्के पडतें.

**करंट अकाउन्टः**—दररोजच्या बाकीवर रु. ५० पासून २५,००० पर्यंत सभासदांना १॥ व इतरांना १ टक्का व्याज दिलें जातें. या खात्याबाबत अधिक माहिती ऑफिसांत मिळेल.

**इतर व्यवहारः**—मर्यादित भांडवलावर व्यवहार करणाऱ्या सभासदांच्या सोईकरितां इतर बँकाप्रमाणें कॅश क्रेडिट ओव्हरड्राफ्ट पद्धतीवर पैसे दिले जातात. तसेंच जामिनावर अगर इतर तारणांवर माफक दरानें कर्जे दिलीं जातात, व त्यांची परतफेड सवलतीच्या हप्त्यानें घेण्यांत येते. त्या संबंधींचे सविस्तर नियम गरजूंनीं मागवावे. **खरेदी विक्री खातेंः**—शेअर व सरकारी रोखे खरेदी विक्रीचें काम माफक कमिशन घेऊन केलें जातें. **हुंड्या वगैरेः**—बाहेरगांवच्या हुंड्या वसूल केल्या जातील व बाहेर गांवावर ड्राफ्ट दिले जातील.

**हिशेबः**—वार्षिक सभेनें निवडलेल्या संस्थेच्या ऑडिटर्सशिवाय संस्थेचे हिशेब **सरकारी स्पेशल ऑडिटरकडून तपासले जातात तसेंच संस्थेची सांपत्तिक स्थिती दर्शविणारें पत्रक दर तीन महिन्यांनीं मुंबई सरकारच्या गॅझेटमध्यें प्रसिद्ध होण्याकरितां पाठविलें जातें.** विशेष माहिती बँकेच्या ऑफिसांत मिळेल.

मुख्य कचेरीः—
२६४, चर्नीरोड,
गिरगांव, **मुंबई.**

सब-ऑफिसेंः—

**१ सिद्धारूढ प्रासाद**
ठाकुरद्वार पोष्टानजीक २६४ गिरगांव मुंबई

**२ बी. बी. रेल्वे स्टेशन समोर बिसमिला बिल्डिंग दादर.**

# सौभाग्यालंकार.

आमच्याकडे मोत्यांचीं कुडीं, नथी वगैरे निरनिराळ्या प्रकारचे दागिने सुंदर, स्वस्त व खात्रीलायक तयार असतात व करून मिळतात. तसेंच ९७ नंबरी किंवा १०० नंबरी सोन्याचे दागिने ग्राहकांच्या मर्जी-प्रमाणें पाहिजे त्या घांटाचे मुदतींत करून दिले जातात. सर्व तऱ्हेचीं नमुनेदार शुद्ध चांदीचीं भांडीं आमचे दुकानीं तयार असतात. मालाच्या चोखपणाबद्दल हमी दिली जाते. त्याप्रमाणेंच सोनेंमोत्यांचे दागिने कोणाला विकावयाचे असल्यास ते आम्ही कसोशीनें विकून देतों. आमच्या कोणत्याही व्यवहारांत एकच भाव व सचोटी असते हें ग्राहकांनीं लक्षांत ठेवावें. माल व्ही पी. नें पाठवूं. पसंत न पडल्यास परत घेऊं.

## दत्तात्रेय गणेश जोशी आणि कंपनी,

**चांदी-सोन्याचे व मोत्यांचे व्यापारी,**

श्रीराम मंदिरासमोर, ठाकुरद्वार, मुंबई २.



रग्ज़्] सुंदर कापडाबद्दल प्रसिद्ध असलेलें [होजियरी

**गिरगांवांतील दुकान**

# शाहाडे आणि कंपनी

**खटाव बिल्डिंग मुंबई, नं. ४**

## पुरुष -- स्त्रिया -- व मुलांस

**लागणारें सर्व तऱ्हेचें कापड, लुगडीं,**


**पातळें, खण, धोतरजोड्या वगैरे भरपूर**

## नवा स्टॉक.


# न. गं. वीरकर

म्हणजेच मुंबईंत खालील ठिकाणीं

## भोजनाची ) व ( फराळाची



## खास सोय





ठिकाण १

**वेलणकर हॉटेल**

गिरगांव ट्रॅम नाका

ठिकाण २

**गिरगांव हिं. रि. हाउस**

कांदेवाडी ट्रॅम नाका

स्त्रिया, मुलें व कुटुंबांसाठीं खास सोय ! प्रत्यक्ष अनुभव घेतल्यास बरें.

## महिला–कलामंदीर

कलाप्रेमी महिलांच्या या आवडत्या संस्थेचे, शिवणकाम, फॅन्सी वर्क, एम्ब्रॉयडरी, ग्लास पेन्टिंग, पेन पेन्टिंग, फोटो फिनिशिंग, ड्राईंग व फ्लॉवरमेकिंग वगैरेंचे वर्ग सुरू झाले असून, अनुभविक शिक्षक व शिक्षकीणी यांच्या खास देखरेखीखालीं सर्व कामें शिकविलीं जातात.

विशेष माहितीकरितां प्रत्यक्ष भेटावें टा. १ ते ४ दुपारीं.

नवलकर क्रासलेन

गिरगांव

आपला बाळ मोठा झाल्यावर कर्तबगार व्हावा अशी इच्छा आहे ना? तर त्याची खेळतां खेळतां करमणूक होऊन, बुद्धिमत्तेची वाढ होईल अशी आमच्या दुकानांतून **मेकॅनो, मोवॅको,** वगैरे आधुनिक तऱ्हेची खेळणीं घेऊन द्या.

तसेंचः—

**आपली बेबी नेहमी आनंदी व हंसतमुख राहिली पाहिजे ना?** तिला आमच्या दुकानांतील तिच्या मनपसंत खेळणीं घेऊन द्या.

याशिवाय, आमच्या दुकानांत सर्व तऱ्हेचे खेळ, कांचसामान, एज्युकेशनल् टॉय्स्, बक्षिसें देण्यास उपयुक्त अशा वस्तु मनपसंत व माफक दरांत मिळतील. तसेंच बाहेरगांवीं मागणीप्रमाणें सामान पाठवू. सुटीच्या दिवशीं मुलांना घेऊन ह्या दुकानांत एक फेरी माराच. मुलें सिनेमा पहाण्यापेक्षां आमच्या दुकानांतील खेळणीं पाहून खात्रीनें खूष होतील.

# विजयलक्ष्मी स्टोअर्स

**क्षत्रिय ज्ञातिनिवास, गिरगांव मुंबई.**

---

**खास महिलांसाठीं**

## विणकाम
## शिवणकाम
## भरतकाम

यांसाठीं लागणारें सर्व जातीचें रेशीम, लोकर, रिबन, कॅन्व्हास वगैरे साहित्य आमच्याकडे योग्य भावांत मिळतें.

**मखमल, सुती व रेशमी कपड्यांवर नमुन्याबरहुकूम सुंदर डिझाईन्स छापून देण्याची खास सोय.**

इतर कोणत्याहि ठिकाणीं आमची शाखा नाहीं.

# बिहार आणि कंपनी,

**पोर्तुगीज चर्चनजीक, गिरगांव, मुंबई ४.**

# भावना--तरंग.

—लेखिका—

(सौ.) इंदिरा तेलंग.

3628

किंमत १२ आणे.

मुद्रकः—

**बी. जी. गंडभीर,**

पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,

सूर्यमहाल, ठाकुरद्वार, मुंबई.

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

प्रकाशकः—

**कुमुद आणि मंडळी,**

१८८ डी, भीमराववाडी,

ठाकुरद्वार, मुंबई (२).

## नीरांजन:—

———:०:———

'भावनेच्या छटां' च्या रसिकांकडून झालेल्या अपूर्व स्वागतामुळेंच मला हा 'काव्यसंग्रह' इतक्या लौकर प्रकाशित करणें शक्य होत आहे याबद्दल मी मराठी वाचकांची साभिमान आभारी आहे.

वास्तविक 'छटां' च्या आधीं 'तरंग'च प्रकाशित व्हावयास पाहिजे होते. पण लग्नाच्या बाजारांत जसा जन्माचा अगोदरपणा कधीं कधीं मागें पडून मोठ्या बहिणीच्या पूर्वी धाकटीचेंच लग्न होऊन जातें, तसेंच कांहींसें या प्रकाशनाबाबत झालें आहे.

सध्यां साहित्यदरबाराच्या दाराशीं कवि आणि काव्य यांना मिळत असलेला उपहासाचा अहेर पाहून पहिल्याच प्रवेशास काव्याचा नजराणा नेण्यास नवख्याचें मन कचरलें तर तें साहाजिक नव्हे का? पण मीं रसिकांचें हृदय टीकाकारांच्या मापानें मापलें याबद्दल मला क्षमा असावी.

१९२० सालांत हायस्कूलांत असतांना आमच्या वर्गानें 'बालिकापुष्प' या नांवाचें एक हस्तलिखित मासिक काढण्याचें ठरविलें, त्याच्यासाठीं माझी पहिली कविता लिहिली गेली. पुढें तें मासिक निघालें नाहीं पण माझा काव्यरचनेचा नाद मात्र तसाच चालू राहिला. भावना-तरंगांतील बहुतेक कविता पहिल्या पांच वर्षांतील आहेत, आणि थोड्या नंतरच्या कालांतीलही आहेत. त्या रचना व विषयभेदावरून रसिकांच्या लक्षांत येतीलच. या संग्रहांत थोड्या अप्रकाशित कविताही प्रविष्ट केल्या आहेत.

भावना-तरंगांच्या प्रकाशनाचें वास्तविक श्रेय माझे प्रिय पती श्री. कमलाकर आनंदराव तेलंग यांनाच आहे. त्यांचे अविश्रांत श्रम आणि माझे प्रेमळ भगिनीपति

श्री. सिताराम गणपतराव वाघ यांचें प्रोत्साहन याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. तसेंच ' स्वराज्याचे ' माजी संपादक श्री. गो. मं. लाड यांनीं आस्थापूर्वक ज्या सूचना केल्या त्याबद्दलही मी त्यांची आभारी आहें. पॉप्युलर प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. बी. जी. गंडभीर यांनीं सुबक छपाई करून दिल्याबद्दल व रेंगे प्रोसेस् स्टुडिओनें थोड्या वेळांत उत्तम ब्लॉक करून दिल्याबद्दल मीं त्यांचे आभार मानतें.

श्री. कृ. रु. दिवेकर यांनीं आपल्या चित्रांनीं ' तरंगांचें ' अंतरंग प्रकाशित केल्याबद्दल, आणि विविधवृत्ताचे आर्टिस्ट श्री. श्री. कृ.नाईक यांनीं कव्हर पेजवरील आकर्षक चित्रानें बहिरंग विनामूल्य सुशोभित केल्याबद्दल मी दोघांचीही ऋणी आहे. आणि शेवटीं ज्या ज्या नियतकालिकांनीं पुनर्मुद्रणाची परवानगी दिली व ज्यांनीं ज्यांनीं माझ्या 'भावनेच्या छटां'चा परामर्श घेतला, त्यांचे त्यांचे आभार मानल्यावर या नीरांजनांतील तेल वात घालणें संपलें.

माझ्या ' तरंगांच्या ' आंदोलनावर एक क्षणभर जरी एखादी जीवननौका विसावली किंवा एक रेंसभर जरी पुढें सरकली तरी माझ्या प्रकाशनाचा हेतू पूर्ण झाला असेंच मी समजेन. आपल्याकडे कार्तिक महिन्यांत देवळांत दीपमाळ पेट-विण्याची एक प्रथा आहे तिला अनुसरून दिपवाळीच्या सुमुहूर्तावर प्रकाशित झालेले हे ' भावनातरंग ' वाचकांचीं हृदयें आनंदानें प्रकाशित करोत अशी आशा करून मीही या शारदामंदिरापुढील दीपमाळेंत माझें नीरांजन पेटवून ठेवतें.


**भावभक्तीनें बांधीलें । भावगीताचें तोरण ॥**
**वरि शोभे दीपमाळ । त्यांत माझें नीरांजन ॥**

(सौ.) इंदिरा तेलंग.

**ता. क.**—पहिल्या अठ्ठेचाळीस पानांत भावतरंगा ऐवजीं भावनातरंग असें वाचण्याची वाचकांनीं तसदी घ्यावी.


# अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | शारदे वरदा भव | १ |
| २ | जिवाची ओढ | २ |
| ३ | दिपवाळी | ३ |
| ४ | नरकचतुर्दशी | ४ |
| ५ | लक्ष्मीपूजन | ५ |
| ६ | वलिप्रतिपदा | ६ |
| ७ | भाऊबीज | ७ |
| ८ | अश्रूंची माला | ८ |
| ९ | आई आणि बाळ | ९ |
| १० | आशा–निराशा | ११ |
| ११ | ऊनपाऊस | १२ |
| १२ | एकच मिनिट | १३ |
| १३ | कर्तव्य जीवनतारा | १५ |
| १४ | गाच गडे ! | १६ |
| १५ | गुंफील कोण ही माला | १७ |
| १६ | चुरडलेल्या हृदयाची स्मृति | २० |
| १७ | तिळगूळ | २२ |
| १८ | तिचें समाधान | २३ |
| १९ | तिमिर वीर !! | २४ |
| २० | दु:खांतलि सुख | २६ |
| २१ | देवाविना देऊळ | २७ |
| २२ | देवाघरची दौलत | ३० |
| २३ | देशभक्त | ३२ |
| २४ | ध्येयवाद | ३४ |
| २५ | नांवाची जादू | ३६ |
| २६ | निद्रित बालकास | ३७ |
| २७ | निराशेच्या दरींत | ३८ |
| २८ | नूतन वर्ष | ४० |
| २९ | पहिली तारीख | ४१ |
| ३० | प्रियतमास | ४२ |
| ३१ | प्रीतीस जागवाया | ४४ |
| ३२ | फीत–फुलोरा | ४६ |
| ३३ | भावाचा ठसा | ४८ |
| ३४ | मज हवी ग गोरी पान | ४९ |
| ३५ | मनाचें गीत | ५२ |
| ३६ | माझ्या हृदयाची रमणी! | ५३ |
| ३७ | मुग्ध प्रेम | ५५ |
| ३८ | मौन | ५९ |
| ३९ | रजनीची प्रभात | ६२ |
| ४० | लपंडाव | ६३ |
| ४१ | वसुंधरा–वस्त्रहरण | ६४ |
| ४२ | विमा | ६५ |
| ४३ | शकुंतलेचें प्रत्युत्तर | ६७ |
| ४४ | शाळेंतील मौज | ६८ |
| ४५ | शिशूस हंसतांना पाहून | ७० |
| ४६ | शेवंतीचें फूल | ७१ |
| ४७ | सखीच्या स्वागतार्थ | ७२ |
| ४८ | स्वप्नतरंग | ७३ |
| ४९ | सर्वस्वदान | ७४ |
| ५० | साष्टांग नमस्कार | ७५ |
| ५१ | सांत्वन | ७६ |
| ५२ | स्मृतीचें ऋण | ७७ |
| ५३ | स्मृतीचे पडसाद | ७८ |
| ५४ | स्वार्थाचा न्याय | ८० |
| ५५ | संध्या | ८१ |
| ५६ | हा कोण ऐकला खेळे | ८२ |
| ५७ | विश्रांति | ८४ |



# नानुज् (ब्रास) वर्क्स्


(स्थापना १८९६)



गिरगांव, मुंबई नं. ४

## गृहोपयोगी स्टील फर्निचर व


इतर शाखा :—





फेन्सिंग्
रेलिंग्ज्
घडीचे दरवाजे
इलेक्ट्रोप्लेटिंग
मेकॅनिकल रिपे-
अर्स् वगैरे, वगैरे.

व

## हॉस्पिटलस्नां लागणाऱ्या सामानाचे कारखानदार





माझे परमपूज्य श्वशुर

ती. रा. आनंदराव सोहिरोबा तेलंग

यांस

हे तरंग

सादर अर्पण केले आहेत.

क्रो०५१ ११८३
२६।१।



# शारदे वरदा भव ।

ग्रंथालय ठाणे
३६२८

शारदेच्या मंदीरांत । दसऱ्याचा महोत्सव ॥
रसिकांनीं उधळीलीं । भावनेचीं सुमें नव ॥
देउळांत शारदेच्या । नऊ धान्यां भर येई ॥
वचसृष्टीच्या ईश्वरें । पेरियेली नवलाई ॥
रसिकांसी येतां जाग । भारावली ग्रंथसृष्टी ॥
दारिं शारदेच्या हांसे । शरदाची पक्वदृष्टी ॥
भावभक्तीनें बांधीलें । भावगीताचें तोरण ॥
वर शोभे दीपमाळ । त्यांत माझें नीरांजन ॥



REFBK-0003728
REFBK-0003728

# जिवाची ओढ

—:०:—

हृदयिंचा गोड हा भाव फुलावा शब्दकासारीं ।
जिवाची ओढ ही गोड मनाला त्रासवी भारी ॥
अपेक्षा नाहिं भ्रमरांची न येवो चंद्र गगनांत ।
सुगंधें कोंदितां वात स्फुरो वा राहुं दे शांत ॥
फुलावी वेल शब्दांची जणूं कीं रातराणीची ।
तुडवित्या पादयुग्माही जयाचें पुष्प दे वास ॥
नभाची लाडकी कोर जगा घाली सुधास्नान ।
निजेल्या रसिकवृत्तीचें तयासी ना मुळीं भान ॥
कळयांचे मूक निःश्वास जगाला जाळिती खास ।
सुके कलिकांसवें पुष्प परी दे गंध विश्वास ॥
फळांची गोड आकांक्षा सुकोनी फूल हें फुलवी ।
फुलेना एकही कलिका जगाचीं अलिकुलें केवीं ॥
हृदयिंचा गोड हा भाव फुलावा शब्दकासारीं ।
येतसे मृत्यु जन्माला म्हणुनि कां जन्म नाकारी ॥

नवी गृहलक्ष्मी, वर्ष १—अंक ९

# दिपवाळी

——:०:——

आलि दिपवाळी । दिपवाळी आली । सृष्टी उत्साहें भरली ॥ धृ ॥

पळाले मेघ । मेघ उदासीन । हांसतें आनंद ऊन ॥

ऊन हांसतें । हांसतें घरीं दारीं । धांदल गृहिणींची भारी ॥

भारि धांदल । धांदल बालिकांची । कणा दारांत काढण्याची ॥

भारि धांदल । धांदल बालकांना । मांडण्या किल्लेही नाना ॥

भारि धांदल । धांदल मालकांना । सांगती 'आणा हो आणा' ॥

फराळासाठीं । साठीं सामान । आणण्या सुटलें फर्मान ॥

पेटती स्टोव्ह । स्टोव्ह आणि चूली । धांदल गृहिणींना झाली ॥

पाडिती बुंदी । बुंदि गोळिबंद । चिरोट्यासाठिं जाळ मंद ॥

मंद हातानें । हातानें घोटी । बदामी हलवा मग ताटीं ॥

ताटिं भाजीलें । भाजिलें बेसनास । कराया म्हेसुर कीं खास ॥

खास वाढाया । वाढायासाठीं । जांवईबापूंच्या ताटीं ॥

करंजी गोड । गोड डौलदार । अष्टमीचि कीं चंद्रकोर ॥

परातीं ठेवी । ठेवि डाळ दाणे । पळविले त्यांतिल गोंद्यानें ॥

थांब हं गोंद्या । गोंद्या मी येतें । पाठिंत धबका द्यायातें ॥

द्यावया येतें । येतें बुंदींत । मध्यानें मारियली मूठ ॥

मूठ मारीली । मारिली आणि पळ । होती तिन्हिसांजा वेळ ॥

# बलि-प्रतिपदा

---:o:---

आली दिपवाळी । दिपवाळी साठीं । नववधू माहेरा येती ॥
येतसे ऊत । ऊत मस्करीला । लटका राग मुखीं फुलला ॥
फुलविले गाल । गालहि आरक्त । उजळितें हास्य नयनप्रांत ॥
गुदगुल्या होती । होती हृदयाला । शोधिते दृष्टी कोणाला ॥
उभा सामोरी । सामोरी नाथ । दृष्टि धरणीस न्याहाळति ।।
हृदयतबकांत । तबकांत दीप ठेवी । प्रीतिची ज्योत त्यांत लावी ॥
विडा अर्पीला । अर्पिलें अहंकारा । गळाला दुजाभाव सारा ॥
दीप ओंवाळी । ओंवाळी वरून । मिळालें सव्याज परतून ॥
पाहूं दे काय । काय दिलें ताई । पाहण्या सर्वांना घाई ॥
आली दिपवाळी । दिपवाळी आली । सृष्टी उत्साहें भरली ॥

प्रभा—१०-११-३६

---

# भाउबीज

——:०:——

पातली मग । मग भाउबीज । भावांबहिणींची मौज ॥
उतूं चालली । चालली शब्दफेंक । भागली प्रेमाची भूक ॥
'पाहसी वाट । वाट कशा ताई । पोस्ट तर केव्हांचें जाई ॥'
'आणि तूं भाई । भाई तव नेत्र । पाहती कोणाचें चित्र ॥'
'शर्थ तव ताई । ताई मी तेथ । होतों ढेकुण शोधीत ॥'
'आणि मी भाई । मीही दारांत । होतें रांगोळी पाहात ॥'
जाहली सांज । सांज फुले गगनीं । नेसली साडी मग भगिनी ॥
काढि रांगोळ्या । रांगोळ्या सुबक । ठेविलें जिलब्यांचें तबक ॥
मांडिला पाट । पाट भाउराया । आग्रह करी फार खाया ॥
लाविले दीप । दीपांच्या ओळी । कुंकुमटिळा लावि भाळीं ॥
टाकिलें पाणी । पाणी उतरून । आरती ओंवाळी बहिण ॥
चोरटें हांसूं । हांसु बंधु ओठीं । घातली भाउबीज ताटीं ॥
चकित मग होई । होई क्षणमात्र । ओळखे पतिचें ती पत्र ॥
जाहली घाई । घाई वाचाया । आंगठी विसरे ती घ्याया ॥
'अमोलिक वाटे । वाटे कां शाई । सुवर्णाहुन तुजला ताई ॥'
लाजरी दृष्टी । दृष्टी निरखीत । आंगठी ती रेखांकीत ॥
लोटलें हांसू । हांसत ती वदते । 'नांव तर वैनीचें दिसतें ॥
आंगठी वरती' । वरती—'बदलून । दिलीसे वाटे मज चुकुन ॥'
पुटपुटे भाई । भाई ओशाळे । हंशाचे पिकले शेतमळे ॥
आलि दिपवाळी । दिपवाळी आली । सृष्टी उत्साहें भरली ॥

संजीवनी—डिसेंबर १९३६

———

# अश्रूंची माला

——:०:——

अश्रूंची माला । आतां गुंफूं दे मजला ॥

दिन ते गेले माणिक मोतीं
हातीं जेव्हां खेळत होतीं
हार तयांचा हृदयावरती
ज्या कालीं रुळला ॥

साधे भोळे बोल वदावे
कांचनस्पर्शें अमोल व्हावें
वरच्यावरती कीं झेलावे
तो काळ परी गेला ॥

गतकालाचें वैभव स्मरणें
हृदय सागरा भरती येणें
तुषार त्याचे नयनिं उसळणें
तो अश्रुरूप झाला ॥

गुलाब खुडले कांटे उरले
तेवीं गतवैभव तें गेलें
कांटेरी परि स्मरण राहिलें
चित्तासि बोंचण्याला ॥

———

# " आई आणि बाळ "

———:०:———

आईः--निज नीज अतां नीज शाहण्या बाळा।
दारिं बागुलबाघा आला ॥

बाळः—नच गाउं अतां अंगाईचें गीत।
मज नीज गडे ना येत ॥
बागुलबावाची उगिच अशी कां भीती।
दाविशी मला तूं खोटी ॥
मज जावूं दे खेळायातें आई।
मधु वाट कधींची पाही ॥
येतों म्हणुनी गे सांगितलें मी त्याला।
बोलूं का खोट्या बोला ॥
तूं सांगशि ना सत्य-वचन पाळाया।
जावूं दे तरि खेळाया ॥

आईः—उगि गप्प अतां बडबड कां तूं करिशी।
झोंपाया विसरुनि जाशी ॥
झणिं झोंप अतां देऊं कां तुज मार।
जरि नाहीं तूं निजणार ॥

बाळः—हें वदसि अतां काय गडे तूं आई।
मज कांहीं समजत नाहीं ॥
तूं दिधलें ना लेक्चर परवां आई।
वदल्याहि सरलाताई ॥

की माराचा धाक नसावा बाळा ।
प्रेमाची भाषा बोला ॥

तूं खेळुं नको, बोलुं नको, चालुं नको ।
हे नकार त्या सांगुं नको ॥

जरि बाळातें परतंत्रचि वागविलें ।
स्वातंत्र्यहि देशा कुठलें ॥

मम बोलांचा आला कां तुज राग ।
सांग ना गडे झणि सांग ॥

मी बोलतसें बोबडेहि जें बोल ।
कां कौतुक केलें बोल ॥

मज चालाया बोलाया शिकवीलें ।
कां उगाच हें तूं सगळें ॥
मी होतों ना लहान इवलासाच ।
नकळे मजला-कांहींच ॥

कां समजूत दिधली मजशी सांग ।
अन् आतां करिशी राग ॥

करि मज आतां पुन्हां चिमुकला बाळ ।
विस्मृतिची घालीं शाल ॥

मग जाइन मीं झोंपीं खासची आई ।
अंगाई गीता गाई ॥

महिला वर्ष १.

११८३
२८/9/13

# आशा निराशा

———:०:———

हृदयाचा या ओघ दडपणें शक्य न कोणाला ।
दडपूं जातां पुन्हां उसळणें अनुभव सर्वाला ॥
त्या हृदयाची मंजुळवाणी सुखवी कोणाला ।
ओघांचा जरि संगम होई अनुभव सर्वाला ॥
स्वतंत्र जगणें स्वातंत्र्याचें हृदया नच ठावें ।
आधाराच्या सौख्यासाठीं देहा जगवावें ॥
आधाराचा प्रकाश पाहुनि छायेचें जगणें ।
प्रकाश जातां छाया जाई अंधाराचि उरणें ॥
स्वयं-प्रकाशी अनंत आत्म्या भ्रम कां तुज पडला ?
नाशवंत या देहीं कैसा निवास आवडला ॥
स्वतंत्र प्रेमा स्वातंत्र्याच्या निधड्या शाहीरा ।
कुठें वसावें न कळे तरि घे शेवटचा मुजरा ॥
दिधला मुजरा शेवटचा तरि अजुनि कसा येथें ।
शाहीरा तूं खराच लोंचट सोडि न कां मातें ॥
नको नको मज ये कंटाळा आतां गानाचा ।
फुटक्या सारंगीचा आणि भेसुर तानांचा ॥
नकोच गाणें नकोच जगणें नकोच मज कांहीं ।
नको त्रासवूं आतां मजला जाई तूं जाई ।
निराश जीवन आधीं माझें नको तुझें गाणें ।
कां रडगाणें ऐकावें जें ललाटींच रडणें ॥
अहा शांतता कशी पसरली परि ये कोठून ।
मंजुळ कोमल सूर गडे अन् ही मधुरहि तान ॥
हृदय गुंगलें गानविमुखता विसरे मग चित्त ।

शाहीरहि मज न दिसे कोठें पडली मग भ्रांत ॥
गत कालावरि आसनस्थ या हृदयमंदिरांत ।
कोण वसे हा भावी-आशा-मुरली वाजवित ॥
निराश जीवन जगणें तरि तें प्रेमचि आधार ।
आशा चित्रहि रंगविण्यातें प्रेम चित्रकार ॥
कालपटावरि उभे आडवे हे तंतू दोन ।
विणणारी परि प्रीतिदेवता गाई विश्वगान ॥

प्राविण्य, वर्ष ७ अंक १-२ 'कमल'

---

# ऊनपाऊस—

——:o:——

कां असें । येतसे हंसें । मुरड कां ओठाला पडतसे ॥
बावरी । दृष्टि ही तरी । पाहते कुणास शून्यांतरीं ॥
जाहला । भंग भृकुटिला । कुणाला प्रश्न गडे टाकला ॥
चमकलें । अश्रुंच्या जलें । नयनयुग क्षणैक स्थिर जाहलें ॥
कां अशी । माळ गुंफिसी । रक्तिमा गालांवर शिंपिशी ॥
बायकां । आइहून कां । अधिक प्रिय तारुण्याचा सखा ॥
जाळि ना । विरह वेलिंना । बहर परि पत्रांचा राहिना ॥
आइ ग । भाउला बघ । उलटलें शब्दाचें मग युग ॥
पाहिली । अक्षरावली । उमटली गालावर मग खळी ॥
शिंपिले । अश्रुंनीं मळे । नेत्र परि आनंदें चमकले ॥
हांसुन । आंसवांतुन । घेशि कां उनपाउस खेळुन ॥

कला, जुलै १९२७

---

# एकच मिनिट

——:०:——

३ वाजतां:— 'झालें ना जाउं गडे जायाचें लांब'।
'आलों मीं थांब जरा एक मिनिट थांब'॥
'केव्हांची नेसुनियां दारिं उभी राहूं।
झाले केव्हांच तीन वाट किती पाहूं।
आटपायचें लौकर कीं जायाचें लांब'!
'आलों ग थांब जरा एक मिनिट थांब'॥

३॥ वाजतां:—'संपुनियां गेला कीं प्रथमही प्रवेश।
होईना तरिहि गडे तुमचा हा वेष।
पाहायचें नाटक तरि पाहुं पुरें'—'थांब
आलों ग थांब जरा एक मिनिट थांब'॥
'झालें बघ तोंडधुणें टॉवेल दे पाहूं।
आटपलें आण फणी झालें चल जाऊं।
ठेविलास स्नो कोठें माहितची नाहीं।
जाग्यावर ठेवायची रीत कधीं बाई'॥

५ वाजतां:—'ठेवितेंच सोडुनि मी पातळ हें आतां।
पोंचणार नाटक कीं संपुनियां जातां।
वेळेवर सज्ज कधीं होणें नच बाई'!
'आलों मी होच पुढें उगिच किती घाई॥
शर्टाची कॉलर ही बसवीतों फीट्।
नेक्टायची गांठ आज येइ न कां नीट।
आजचि कां भांगहि हा साधत ना थांब।
आलों ग थांब जरा एक मिनिट थांब'॥




९ वाजतां:—'जेवायूचें झालें ना वाढूं का पान।
रामा* दारांत उभा आहे का भान।
वेळाचें'–'चढविलाच बूट नवा थांब।
बांधितोंच रिस्टवॉच एक मिनिट थांब'॥

संजीवनी—२६–१०–३३

---

* सुटा गडी भांडीं घांसण्याच्या कामीं कसा वक्तशीर असतो याचा वाचकांना अनुभव आहेच.

# कर्तव्य जीवनतारा

---:o:---

चमके गगनीं प्रभाततारा । दिक्प्रांतांतें प्रकाशणारा ।
रजनी आवरि तिमिरपसारा । कोकिल तैं गातो ॥
वृक्षलतांच्या पानांवरुनी । मौक्तिकसर ते पडती तुटुनी ।
अभिषेकिति नव वसुधाराणी । कोकिल तैं गातो ॥
मेघांची करि नाव मनोहर । उषादेवता बैसे त्यावर ।
फेंकी नवसंदेश जगावर । कोकिल तैं गातो ।
रविकिरणांचे लेख गुंफिले । पुष्पदलांवरि चित्रित झाले ।
रसपानीं त्या भ्रमर गुंगले । कोकिल तैं गातो ॥
रजनीचा काळोख विसरुनी । संध्या नाचे दिव्य नभांगणिं ।
स्फुर्ती देई विश्वालागुनि । कोकिल तैं गातो ॥
विश्रांतीची शय्या टाका । कर्तव्याच्या ऐका हांका ।
सांगायातें त्रिभुवनलोकां । कोकिल तैं गातो ॥
कुरूपतेची लाज न जाणे । सुस्वरतेचा डौलहि नेणें ।
कर्तव्याचें लेवुनि लेणें । कोकिल हा गातो ॥
विश्वाचा हा भव्य पसारा । कदा न विसरी जीवनतारा ।
विनवाया इतुकेंच ईश्वरा । कोकिल तैं गातो ॥

प्राविण्य

---

# गाच गडे !

-:o:-

उदास वाटे चित्तालागीं कैसें रिझवावें ।
गाणें गावें तरी अनुत्सुक हृदयाचि कां व्हावें ॥
वना नादवी मोहन कान्हा मुरलीच्या नादें ।
काय हरपलें भान मनाचें त्याच्या पडसादें ॥
नभीं चंद्रिका निजप्रकाशें ओती सुखशांती ।
म्हणुनि काजवा लपवितसे कां अंगींची कांति ॥
मंजुनिनादें कविराजांनीं सृष्टी मोहियली ।
म्हणुनि हृदयिंची अस्फुट वाणी लज्जित कां झाली ॥
लज्जेचा तरि रंग पसरुं दे शब्दाच्या गालीं ।
शब्दमूकता लपविल कैशी गालांची लाली ॥
जरी लाजसी शब्दांलागीं करीं मूकगान ।
ऐकायातें करीन तेंहि मुकाच मी कान ॥
गाच गडे परि गाई आतां मूक तरी मूक ।
मुक्या मनानें शांतवीन मग हृदयाचें दुःख ॥

मधुकर

# गुंफील कोण ही माला

———×———

सांगा हो सांगा मजला
गुंफील कोण ही माला ॥ ध्रु० ॥

ही प्रभात होतां लपली कोठें तरि रजनी बाला ।
आकाशीं तारा लपल्या चंद्रही जात गेहाला ।
उदयाचलिं भानू दिसला का शोधाया त्यां आला ।

लाटांच्या पानांवरती ।
किरणांचीं कमलें फुलती ।
मोदभरें फुलुनी डुलती ।

परि लपल्या सर्वहि बाला ॥ गुंफील–॥
सोनेरी रंग तयांचा मोही जरि मानसभृंग ।
परि वास तयांतें नाहीं रसहीनचि नुसता रंग ।
इच्छावा स्वार्थी भृंगें मनुजें कां त्यांचा संग ।

हें स्वार्थाचें जग सारें ।
स्वार्थास जीव देणारें ।
स्वार्थींच सदा रमणारें ।

मग उगिच कशाला बोला ॥ गुंफील–॥
ह्या हृदयाच्या बागेंत प्रेमाच्या कलिका फुलती ।
प्रतीच्या पवनासंगें प्रीतीच्या रंगें खुलती ।
त्या पावित्र्याच्या तेजें स्वार्थहीन उज्वल होती ।

परि जरि कां त्यां पुष्पांस ।
विषयाचा येत न वास ।
तरि मोलशून्य कीं खास ।

स्वार्थांध जगीं बिनमोला ॥ गुंफील-॥
जरि गुंफायातें जावें म्हणतात सर्व जन वेडी ।
ही जननिंदेची मोठी स्वातंत्र्यपदिं असे वेडी ।
स्वार्थाच्या मोहा जिंकी तो एक मात्र ती तोडी ।

जरि म्हणाल मजसी वेडी ।
तरि हेतु मी न हा सोडी ।
मज वेडाची बहु गोडी

गुंफीन मीच ही माला परि अर्पावी कोणाला ॥
जरि जगता ही अर्पावी तरि आगर हें स्वार्थाचें ।
एकाच स्वार्थनिःश्वासें करपुनी पुष्प जायाचें ।
हा विचार हृदया भेदी निःशब्द करी मम वाचे ।

गुंफुनी अशीं पुष्पें हीं ।
दुखवावीं कैशीं बाई ।
अर्पावीं कवण्या पायीं ।

स्वार्थास बळी द्यायाला ॥ गुंफील-॥
हृदयाची दोरी विणुनी दुःखाचा दिधला पीळ ।
स्वार्थासी शुद्ध करोनी ओतिली सुई ही सरळ ।
गुंफिलीं शांतिहस्तें हीं प्रेमाचीं पुष्पें सकळ ।

ऐशी ही घेउनि माला ।
जातें मी अर्पायाला ।
स्वार्थाच्या पदकमलाला ।

# कला व जीवन

## कलेसाठीं जीवन कीं जीवनासाठीं कला ?

या वादांत आपण पडूं नये हेंच बरें. तथापि दोहोंनाही एक-मेकांची जरूरी आहे ही गोष्ट मात्र खरी.

पण त्याहीपेक्षां दोहोंनाही आमची मात्र जरूरी आहेच आहे, हें आम्ही छातीठोकपणें सांगतों.

## भरतकाम, विणकाम, शिवणकाम

या कलाकौशल्याच्या गोष्टींना लागणारें सर्व प्रकारचें उत्कृष्ट साहित्य व लहान पण उपयुक्त यंत्रें आमच्या दुकानीं माफक किंमतींत विकत मिळतात. कलाकौशल्याचे सुंदर व नावीन्यपूर्ण नमुने आमच्याकडे पहा—व कलाकौशल्य हस्तगत करण्या-करितां आमचा सल्ला मोफत घ्या.

# एम. मधुकर ॲण्ड ब्रदर्स

दादर ट्रॅमटर्मिनस मुंबई.— टे. नं. ६०६७७

जगप्रसिद्ध "पॉफ" कंपनीचीं शिवण्याचीं यंत्रें

## रोकडीनें व हप्तेबंदीनें मिळतात.

सर्व तऱ्हेचीं शिवण्याचीं यंत्रें माफक दरांत दुरुस्त करण्यांत येतात.

परि जरि कां त्यां पुष्पांस ।
विषयाचा येत न वास ।
तरि मोलशून्य कीं खास ।

स्वार्थांध जगीं बिनमोला ॥ गुंफील–॥
जरि गुंफायातें जावें म्हणतात सर्व जन वेडी ।
ही जननिंदेची मोठी स्वातंत्र्यपदिं असे वेडी ।
स्वार्थाच्या मोहा जिंकी तो एक मात्र ती तोडी ।

जरि म्हणाल मजसी वेडी ।
तरि हेतु मी न हा सोडी ।
मज वेडाची बहु गोडी

गुंफीन मीच ही माला परि अर्पावी कोणाला ॥
जरि जगता ही अर्पावी तरि आगर हें स्वार्थाचें ।
एकाच स्वार्थनिःश्वासें करपुनी पुष्प जायाचें ।
हा विचार हृदया भेदी निःशब्द करी मम वाचे ।

गुंफुनी अशीं पुष्पें हीं ।
दुखवावीं कैशीं बाई ।
अर्पावीं कवण्या पायीं ।

स्वार्थास बळी द्यायाला ॥ गुंफील–॥
हृदयाची दोरी विणुनी दुःखाचा दिधला पीळ ।
स्वार्थासी शुद्ध करोनी ओतिली सुई ही सरळ ।
गुंफिलीं शांतिहस्तें हीं प्रेमाचीं पुष्पें सकळ ।

ऐशी ही घेउनि माला ।
जातें मी अर्पायाला ।
स्वार्थाच्या पदकमलाला ।

परि द्या काशि न कोणाला ॥ गुंफील –॥
प्रीतीच्या जीवा द्यावी तरि रुसला तो मजवरती ।
समजावूं कैसें त्यासी ही शंका उपजे चित्तीं ।
जावूं तरि कैसें जवळी अपाया त्याच्या कंठीं ।

हृदयाचीं द्वारें बंद ।
करुनि वसे मम आनंद ।
उघडुं कशी मी मतिमंद ।

खोला हो दारें खोला ॥ गुंफिली कशा ही माला ॥
गुंफिली कशासी माला स्वार्थास बळी द्यायाला ।
छे नकोच घालिन माला मम कंठीं ही मी विमला ।
लेवुनी प्रीतिचीं सुमनें बलि देइन मम जीवाला ।

त्यागाचें शस्त्र करून ।
तव द्वारीं देइन प्राण ।
जीवाचें करिं बलिदान ।

घे करीं झणीं शिरकमला । गुंफाया नूतन माला ।
गुंफुनी तयाची माला स्मृतिसूत्रें हृदयावरतीं ।
ही अखंड तव नाचूं दे प्रेमाची जेवीं स्फूर्ती ।
जीवनीं नसे व्हायाची ज्या ईच्छेची मम पूर्ती ।

मरणाचें घेउनि मोल ।
देशिल कां तें मज बोल ।
जरि नाहीं तूं म्हणशील ।
तरि स्वार्थपदीं बलि दिधला ।

गुंफील कोण मग माला ॥

# चुरडलेल्या हृदयाची स्मृति

---×---

वारा वाहे मंदगती। हिरवीं पानें सळसळती
मेघांचीं अल्लड बाळें। चरणीं सोनेरी वाळे
घोडा करुनी किरणांचा। खेळ खेळती मौजेचा
रवि मावळला।
अश्व पळाला।
खेळ थांबला।
हिरमुसलीं बाळें रडती। धारा पृथ्वीवरि पडती
चंद्र हासला आकाशीं। मांगल्याचा कीं आशी
शुभ्र चांदणें चहूंकडे। सुधारसाचे घालि सडे
नीलनभाच्या चौफेर। तारांचा धरुनी फेर
नाच नाचणें।
हळूच हंसणें।
फुलें हंसविणें।
हेतूविण हें कार्य असें। सदा तयाचें चालतसे
हास्य पसरलें जगावरी। कळी एकली मुग्ध परी
कांटेरी पानामागें। आडआडुनी काय बघे
लज्जान्वित मुख आरक्त। चित्त जाहलें अनुरक्त
डोळे खिळले।
भान हरपलें।
वेडें झालें।
हेतुविना हें कार्य असें। सदा जगावरि चालतसे
नयनिं चिंतनीं एक दिसे। कलिकेसाठीं चित्त पिसें
रंग गुलाबी कलिकेचा। ठसा उमटला प्रीतीचा
हृदयाकाशीं रंग भरे। व्यापुनि हृदया जगिं पसरे

गुलाब इकडे ।
गुलाब तिकडे ।
तोच चहुंकडे ।
जीवहि रंगीं त्या रंगे । हंसेल कां परि मजसंगें
वीज चमकली मेघांत । तेज पसरलें विश्वांत
एकाचि गानाची लहरी । चित्तातें फुलवीत परी
तेवीं कलिका फुलेल का । हृदयातें या फुलविल का
क्षणैकचि जरी ।
होय आस पुरी ।
जीव धन्य तरी ।
हेतूविण हें गान असें । सदा जगाचें चालतसे
ध्यास एक हा दिनरजनीं । हीच विनवणी प्रभुचरणीं
वेड्या हृदयाचे बोल । दैवातें जरि रुचतील
तरी उणें मग काय असे ? । पृथ्वीवरती स्वर्ग वसे !
कळी चुरडिली ।
पदीं तुडविली ।
आशा गेली ।
फुलवावें तिज कुणीं कसें ? । प्रश्न विचारी चित्त पिसें
जगीं कुणाचा कुणी नसे । प्रेमासाठीं परी पिसें
आशेवरती चित्र फुले । दैवाघातें परि मिटलें
पुन्हां फुलविणें शक्य नसे । :कळे परी हें चित्त पिसें
मनींच जळणें ।
हृदय वितळणें ।
अश्रू गळणें ।
प्रेमाचें जगणेंच असें । जगीं निरंतर चालतसे

सह्याद्री–नोव्हेंबर १९३५

---

# तिळगूळ

———:०———

केव्हांची राहिली सारखी उभीच सज्जावरी।
कांट्याचें* धावणें वाढवी अधीरता अंतरीं।
वळणावरची नजर खेंचते क्षणोक्षणीं टिकटिक।
पळापळाचीं युगें जाहलीं उत्कंठेसन्मुख।
वाचायातें करीं घेतली 'प्रेमाची' मग 'हुल'।
उलटायाचें पान राहिलें श्रवणा हो चाहुल।
'थाट आजचा और असे हा फोटोची पोज का?।
काव्याची वा स्फूर्तिदेवता फुकाच या अरसिका'।
'राहूं द्यावी उगाच चेष्टा तिळगुळ घ्यावा गडे।
संक्रान्तीच्या सत्काराची नौबत का ही झडे।
केव्हांची मी वाट पाहतें!' 'रुसवा शोभे तुला।
घेतलास का रुसव्यांतिल या रक्तरंग तिळगुळा।
कांट्याच्या§ अग्रांत ठेविले कटाक्ष सामावुन।
प्रीतिशरानें विद्ध कराया सुहृदाचें का मन?'।
हातातें परि हात लागतां हळुच 'हाय' ती वदे।
अधीरतेनें पुसे तियेला 'काय तरी पाहुं दे'।
'घोळवितां तिळ ताटामाजीं चटके बोटावरी।
उठले' आणिक प्रश्नचिन्ह मग पतिच्या नयनांतरीं
'सांगायाचें काय त्यांत, हें स्त्रीजातीचें जिणें।
चटक्याची या मिरासदारी जन्मताच पावणें'।
संसारांतिल मधुबोलास्तव हृदयाच्या भावना।
कर्तव्याच्या आंचेवरती घोळवितांना मना।
चटके बसती जाणिव त्याची असे तरी का कुणा
कांट्याची तीव्रता मापते अबलांच्या जीवना।

स्त्री–जान्युअरी १९३७

---

* मिनिट कांटा § तिळगुळाचे कांटे

# तिचें समाधान

—:०:—

केव्हांचा एक विचारा चिमणा दारांत।
जाईचा वेल होता कोमेजुन जात।
जात्यायेत्यांनीं पाहुनी मुरडावें नाक।
वेळ नसे कोणा ऐकण्या हृदयाची हांक :
गरिब विचारी ती घाली अश्रूंचें पाणी।
प्रीतीची छाया फुलवी पुष्पांची राणी।
वठत्या वेलीचें पिवळें दैन्य लया गेलें।
टवटवलें पान हिरव्या सौंदर्यें नटलें।
कलिकांचे घोंस डोलती डौलें धवलांग।
जात्यायेत्याची रसिकता घेई मग जाग।
तरुणींचे केंस आणि तरुणांचे कोट।
पुष्पांच्या भवतीं बांधिती हक्कांचे कोट।
विभवाची दात्री करीना हक्काचा हेवा।
समाधान जीवा वाटे प्रीतीची सेवा।

# तिमिर वीर ! !

——:०:——

रजनी येई भेटाया ।
वसुंधरेतें, घेउनियां ।

तिमिरबंधुतें स्वतासवें ।
लज्जित सूर्य मुखा लपवे ॥

लाजेला मानुनि भय तो ।
तिमिरवीर गर्वे वदतो ।

जरि मी तेजोहीन असे ।
परि तेजातें दिपवितसे ।

मजसम कोणी !
न दुजा जाणीं ।

अखिल त्रिभुवनीं ।
धन्य धन्य मी जगतांत ।

जिंकियला वसुधानाथ ॥
तदा काजवा ये पुढती ।

म्हणे हारवूं दुष्टमती ।
परि तिमिराचें बळ मोठें ।

खद्योताचें धैर्य सुटे ।
तों मदतीतें दीप सरे ।

शूर काजवा परत फिरे ।
म्हणे गड्यांनो या या या ।

या तिमिरातें जिंकूंया ।
फिरूनि हल्ला ।

करुनी गिल्ला ।
त्यावरि केला ।

परी शेवटीं तिमिराला ।
विजयश्री घाली माला ॥

होउनि तारे क्रुद्ध तदां ।
हातीं घेउनि किरणगदा ।
सेनापति रजनीनाथ ।
करुनी युद्धासी येत ।

युद्ध घोर तें चालतसे ।
तिमिरहि शौर्या दावितसे ।

ताऱ्यांतें पळवी अंतीं ।
सेनापति मानी खंती ।

तोंचि सूर्य तो । युद्ध पाहतो ।
झडकरि येतो ।

भाला फेंकुनि तिमिरातें ।
पळवी सुखवी अखिलांतें ॥

# दुःखांतील सुख

———:०:———

हाय ! लागलें; रक्त पातलें:
हांसली गुलाबकळी, दुःख विसरलें ॥ १ ॥

मेघ पातले, तिमिर दाटलें;
हांसतांचि वीज परी, जग प्रकाशलें ॥ २ ॥

प्रसववेदना, दुःख देति ना ?
बाळ परी मधुरमुखी, हंसवितें जनां ॥ ३ ॥

दुःख व्यापितें, अखिल सृष्टितें;
हास्याची परि लकेर, जीव जगविते ॥ ४ ॥

भूतकालिंचें, दुःख जाचतें;
एकाकी गोड स्मृती, हृदय हंसविते ॥ ५ ॥

ध्येयपूजना, मार्ग दिसत ना;
आशेचा किरण परी, हंसवितो मना ॥ ६ ॥

नाहिं संस्कृती, मंदहि मती;
अंतरिंची हांक परी, देई जाग्रती ॥ ७ ॥

संजीवनी—२७—७—३३

# देवाविना देऊळ

——:०:——

मन रमवायातें गेलें सरितेच्या घांटावरती ।
सौंदर्यसुखाची शांती मम जीवाची विश्रान्ति ।
पाहतां रम्य तें स्थान देहभाव नुरला चित्तीं ।

आकाशीं संध्या फुलली ।
सृष्टीची कलिका खुलली ।
सोनेरी बुरख्याखालीं ।

आरशांत कीं सरितेच्या दोघांच्या भेटी होती ॥ १ ॥

लाटांचा मंजुळ नाद पडसाद करी हृदयांत ।
वाऱ्यावर हलती पानें मिसळला रवहि तो त्यांत ।
पक्षांच्या किलबिल शब्दें दशदिशा दणाणुनि जात ।

धेनूचा पदरव उठला ।
पांव्याचा मधुस्वन आला ।
हृदयांत जाउनी घुमला ।

ब्रह्मांड नादमय झालें हरपलें भान क्षणएक ॥ २ ॥

सरितेच्या पैलतडीला शूद्रांची वसती होती ।
अस्पृश्य लोक ते सारे गांवाबाहेर रहाती ।
अज्ञानी जीव तयांना हरिभजनीं वाटे प्रीती ।

हरिनाम मुखानें घ्यावें ।
भजनांत चित्त रंगावें ।
क्षणएक दुःख विसरावें ।

टाळ्यांच्या गजरामाजी जीवांतें त्यां विश्रान्ति ॥ ३ ॥

कालीचें रम्य स्थान सरितेच्या घांटावरती ।
कळस तो भिडे गगनाला सोन्याची त्याची कांति ।
देऊळ भव्य गंभीर परि आंत दिसेना मूर्त्ति ।

तों ध्वनी कुठुनि हा आला ।
हृदयांत कसा मम शिरला ।
‘ अस्पृश्य जवळ जरि केला ।

परतेन तरिच बाळांनो देउळांत मी तुमच्या या ॥ ४ ॥

अस्पृश्य स्पृश्य दोन्हींही बाळें मम असती जाण ।
अस्पृश्य दीन जरि असती बाळांतें मी रक्षीन ।
ब्रीद् हें जगन्मातेचें, बाळें मज सर्व समान । ’

ऐकुनी तदा ते शब्द ।
हृदयांत उठे पडसाद ।
हा समानतेचा वाद ।

कुठुनियां जगन्मातेच्या हृदयांत कसा हा शिरला ॥ ५ ॥

होईल काय हें शक्य जाइल का आज लयाला ।
रूढी ही वहुत दिसांची सोडील कशी चित्ताला ।
जखडल्या हातपायांनीं येइल का चालायाला ।

हें रक्ताचें गोंदवण ।
कैसें जाईल पुसून ।
गीतेचे चातुर्वर्ण ।

विसरावे कैसे आज मुळिं कळेनाच चित्ताला ॥ ६ ॥

देऊळ मूर्तिवांचोनी पाहवेच ना नयनाला ।
अस्पृश्यवीण हिंदूंचा धर्मही पटे न मनाला ।

तों नवल विशेषचि घडलें दाटला पूर सरितेला।

पाणी मग दुथडी भरलें।
देऊळही आंत बुडालें।
अस्पृश्य-स्पृश्य नच उरलें।

जाहले सर्व एकत्र सरितेच्या लोंढ्याखालीं॥ ७॥

वावरे चित्त तें माझें नाठवे काय मग झालें।
गरगरां विश्व तें फिरलें पाण्यानें अवघें भरलें।
हा प्रलयकाल कां आला कलियूग पूर्ण कां झालें।

उघडले नेत्र परि जेव्हां।
पाहिलें काय मी तेव्हां।
उच्चार कराया जिव्हा।

आश्चर्यें ती निःशब्द जाहली तदा क्षण एक॥ ८॥

अस्पृश्य-स्पृश्य ते सारे देउळांत गोळा होती।
भजनाच्या गजरामध्यें मंत्रशब्द झाले घेती।
मृत्यूच्या दाढेखालीं भेदभाव सारे विरती।

अस्पृश्य भाव विसरोनी।
नत होति कुणाच्या चरणीं।
पाहतां मान उचलोनी।

प्रगटली जगाची माता देउळांत पीठेवरती॥ ९॥

# देवाघरची दौलत

——:०:——

प्रभातकालीं वृक्षलतांवर । रत्नांचे चमकति हे हार ।
सोन्याच्या कोंदणांत सुंदर । पदकें पाचूंचीं ॥ १ ॥

बंधाऱ्याची लाल चौकट । हिरवें पिवळें डोले शेत ।
शुभ्र पांखरें नील नभांत । उडती आनंदें ॥ २ ॥

ओढ्याच्या आरशांत चंचल । छायांचा मग चाले खेळ ।
झोके घेती सांजसकाळ । लाटांच्या वरती ॥ ३ ॥

झुळझुळझुळ निर्झरसंगीत । सळसळ पानांची त्या साथ ।
मंजुळ विहगांचें मग गीत । वाऱ्यावर विहरे ॥ ४ ॥

माध्यान्हींचा होतां अवसर । माथ्यावरतीं येई दिनकर ।
जरी चहुंकडे रखरख फार । झोंपडींत गार ॥ ५ ॥

फणसाच्या आणी आंब्याच्या । छायेखालीं घर धाव्याचें ।
माथेरान करिति जिवाचें । पंखे पानांचे ॥ ६ ॥

सांज फुले जैं आकाशावर । सृष्टीचा उतरे शिणभार ।
ओढ्याच्या मग कीं गालावर । गुलाब फुलतील ॥ ७ ॥

कांठावरच्या तृणसृष्टीशीं । हितगुज करतां ऊत हंशासी ।
चुकून आदळतां खडकासी । सडा मौक्तिकांचा ॥ ८ ॥

निळा गुलाबी पलंगपोस । कलावतूची नक्शी त्यास ।
राखी कांबळ पांघरण्यास । डोंगरराजास ॥ ९ ॥

फुलांफुलांच्या नाजुक कळिया। वाऱ्यासंगें अस्फुट फुलल्या।
दिशांतरीं कीं भरून उरला। सुवास पुष्पांचा ॥ १० ॥

सृष्टींतिल हें अत्तर असलें। वाऱ्यानें जरि आज सांडलें।
उद्यां उगवतां असेंच भरलें। निसर्गभांडारीं ॥ ११ ॥

घरोघरीं मग दीप लागती। सांजवातही तुळशीपुढती।
बाळांलागीं शुभं करोति। शिकवितसे माता ॥ १२ ॥

चंद्राची घेउन कैपंची*। निरांजनें मग नक्षत्रांचीं।
पेटविते माता जगताची। असंख्य गगनांत ॥ १३ ॥

देवाघरची दौलत असली। उघड्यावरती असे उधळली।
चोरीची मग भीती कुठली। फुकटचि सकलांना ॥ १४ ॥

---

* मूठ असलेलें तेलाचें भांडें व पणती यांची एकत्र सांगड.

## देशभक्त

———:०:———

( या कवितेला विविध वृत्ताच्या चढाओढींतील उत्तेजनपर पारितोषिक देण्यांत आलें आहे )

पदोपदीं सुमनांची वृष्टी ॥
वाऱ्यावरती झेंडे उडती ।
गृहागृहांची शिखरें डुलती ।
मधुनी त्यांच्या कळस चमकती ।
दृश्य अजुनि तें नयनांपुढती ॥ १ ॥

वर्षांची हो आजचि भरती ॥
स्त्रीपुरुषांनीं रस्ते फुलले ।
जयजयकारें सृष्टी हाले ।
वाद्यनिनादें विश्व कोंदलें ।
नाद तयाचे अजुनी घुमती ॥ २ ॥

इच्छा जरि कां मी उच्चारी, ॥
'सूर्य नभींचा आणा भूवर ।
उगाच कां हा जयजयकार ?' ।
सवाल जनतेचा मग त्यावर ।
'आणिक कांहीं आज्ञा दुसरी ?' ॥ ३ ॥

सूर्यातें आणाया भूवर ॥
होती कंबर मींच बांधिली ।
वर्षांची आहुती टाकिली ।
यत्नांचीही शिकस्त झाली ।
माती परि उरली हातावर ॥ ४ ॥

शुक्र होतसे तेथें—आज।
एकाकी कुणि सज्जावरती।
तुरुंगाच्या दारांतहि जमती॥
गर्दी परि स्तंभाच्या* भंवतीं।
दुर्दैवाचा बघण्या साज॥५॥

मेघाच्या वर्षावाखालीं॥
पदोपदीं दगडांची वृष्टी।
रक्त ओघळे गालांवरती।
हातकड्या मनगटांत रुपती।
कर्जाची भरपाई झाली॥६॥

असेंच माझें येणें जाणें॥
धारातीर्थी पतन पावले।
धन्य जीव अजरामर झाले।
'विश्वानें तव रीण फेडिलें'।
देव विचारी 'माझें देणें?'॥७॥

मुक्त खरा मी नुरलें देणें॥
विश्वाच्या स्वार्थी पदकमलीं।
सर्वस्वाची होळी केली।
अपमानानें फेड घेतली।
देवानें भरपाई करणें॥८॥

शिवधनूस–२६–८–३४

---

* वधस्तंभ.

# ध्येयवाद

———:०:———

क्षुद्र गोष्टिंना महत्त्व देतां।
कां मनांत झुरतां फुका फुका ॥ धृ० ॥

रात्रीचा अंधार पसरला।
रंगछटांचा उडे तजेला।
वृक्षलतांच्या छाया झाल्या।
निराशवृत्ती धरूं नका ॥ कां मनांत—॥

काळोखाच्या नभपटलावर ;
तारांचा मग धरुनी फेर।
बीजेची ये हळूच कोर।
उगाच चित्तीं झुरळुं नका ॥

जेविं निजेच्या बीजामधुनी ;
स्वप्नांकुर ये मधुर फुटोनी।
भावभावनांनीं बहरोनी।
जागृति येतां दिसेल का ॥

कधीं तरी परि रात सरेल ;
चंद्रतारका स्वप्न विरेल।
दिशादिशांतरिं तेज भरेल।
श्रद्धा हतुकी सोडुं नका ॥

काळाखोचा बुरखा सारुन।
हळुच उषा पाही डोकावुन।
अर्धसत्य तें विश्वीं जापुन।
मुळींच दृष्टी ढळवुं नका॥

चैतन्याचा अमोल ठेवा।
आनंदानें उद्या यावा।
आस एक ही मनीं वाधवा।
इकडे तिकडे झुकूं नका॥

कां मनांत झुरतां फुका फुका॥

सह्याद्रि—डिसेंबर १९३६

# नांवाची जादू

———:•:———

नांवाची जादू पसरिते गालांवर लाली ।
नांवा[2]साठीं ना माता बंदिवान झाली ।
नांवा[3]च्यासाठीं येई कर्तव्या जाग ।
नांवा[4]च्यासाठीं सोशिती त्यागाची आग ।
अंत[5]र कापाया लागते नांवाची नाव ।
नांवा[6]ची हांक दाविते हृदयांतिल भाव ।
नांवा[7]च्यासाठीं जाहले किती रक्तपात ।
नांवा[8]च्यासाठीं तेवते कुठें सांजवात ।
नांवाच्यासाठीं बांधिला रत्नांचा ताज ।
रत्नें जरि गेलीं राहिलें नांव परी आज ।
अनोळखी हुंडी पटवी नांवाचें नाणें ।
कुरूपतेलाही शोभवी नांवाचें लेणें ।
ओळख विश्वाची जगते नांवाच्यावरती ।
नांवाची सीमा उलटतां शून्याची वसती ।

———

१ उखाण्यांतील २ पित्याच्या ३ घराण्याच्या ४ शील ५ टपालांतून
६ संबोधन ७ राष्ट्राच्या ८ इब्राहिमरोझ्यांत ९ प्रथितयश लेखकाचें

# निद्रित बालकास

हांस हांस मधुर बाळ नयनिं नीज कां
मिटाति नयन उगिच काय, हंससि कां फुका ॥ धृ० ॥
स्थिर झाली तव दृष्टी ।
अवलोकुनि नव सृष्टी ।
आश्चर्यें चकितचित्त म्हणुनि हंससि का ॥ १ ॥
गत-जीवन-मधुर-स्मृती ।
विहरे तव हृत्प्रान्तीं ।
सुखमनें वघुनि तीस सांग हंससि का ॥ २ ॥
बालत्वें तूं अजाण ।
मोहीं परि मन सुजाण ।
गर्वभरें हंससि काय सांग बालका ॥ ३ ॥
असशी तूं बाल मुग्ध ।
कैसा मग गर्वधुंद ।
शंका विपरीत म्हणुनि सांग हंससि का ॥ ४ ॥
रडुनी जग होत शांत ।
प्रभु तुज मग पाठवीत ।
शिकवाया हास्य जगा म्हणुनि हंससि का ॥ ५ ॥
वेगें निर्झर धांवत ।
काय असे त्यांत हेत ।
हंसणें हा बालधर्म म्हणुनि हंससि का ॥ ६ ॥
विहगांचें विश्वगान ।
चमकतसे तारागण ।
हेतुविण कार्य तेंवि तूंहि हंससि का ॥ ७ ॥
वाटे कीं मूर्तिमंत ।
आनंदचि जन्म घेत ।
जीवन तव हास्य हेंच म्हणुनि हंससि का ॥ ८ ॥

महिला—डिसेंबर १९३४

# निराशेच्या दरींत

———:o:———

भविष्यगानीं गुंग निरंतर ।
आदर्शांच्या मार्गीं लागुनि
वस्तुस्थिति मेलें विसरोनी
परिस्थिती येतां पसरोनी
मुख आपुलें तें घोर भयंकर ॥

आशेचे मग मिटले डोळे ।
थरथर कांपे तनु ही सारी
हृदयासी येतसे थरारी
वैराग्याची भीषण घेरी
येतां शून्यत्वीं मन विरलें ॥

प्रेमाचा आधारचि सुटला ।
दुःखाच्या मग झंझावातीं
तुटती कर्तव्याच्या गांठी
अश्रुंची नयनीं हो दाटी
प्रकाश दिसणें मग तो कुठला ॥

अंधाऱ्या आयुष्यीं जगणें ।
भीतीचें साम्राज्य पसरलें
सत्याची जाणीव विसरलें
शंकाभूत मनीं संचरलें
जळो जिणें हें लाजिरवाणें ॥

धैर्याचें धीरत्वचि खुटलें ।
आयुष्याचें पडलें कोडें
कर्तव्याचें अडलें घोडें
शंकाभूतहि मागें ओढे
पुढें सरकणें मग तें कुठलें ॥

निमिष एक मग स्तब्धचि झालें ।
आवळल्या हृदयाच्या गांठी
श्रद्धा भगिनी येई भेटी
धीराच्या मग सांगे गोष्टी
मृदुवचनांसि मनीं सांठविलें ॥

क्रांतीचा मग केला कोट ।
श्रद्धामंत्रें भूत पळालें
हृदयाचें दीनत्व गळालें
आशेचें मग बलहि कळालें
पुनर्जीवना मन हो धीट ॥

कोड्याचें सांपडलें उत्तर ।
प्रीतीचीं कुसुमें मग फुललीं
आनंदें गगनांत उधळलीं
अरुणरूप मग तिथें पावलीं
जगद्वंद्य व्हायातें सत्वर ॥

Wilsonian—1924

# नूतनवर्ष

---:०:---

नववर्षाची नवलाई। निशा गातसे अंगाई।
रजनीच्या बुरख्याखालीं। श्रांत विश्व झोंपीं आई।
नभीं तारका लुकलुकती। सुखस्वप्नांच्या गोड तती।
मध्यें चंद्रमा आशेचा। हृदयातें हंसवायाचा।

प्रभात झाली।
प्रभा फांकली।
प्रतिभा फुलली।

प्रकाश पसरे चहुंकडे। आनंदीं आनंद गडे।
उषा हांसली नभावरी। गुलाब फुलले दगावरी।
सुवास सुष्टीवरि पसरी। मुखें कळयांचीं मग हंसरीं।
विहगांतरिं स्फुरवी गान। विश्वाचें हरपे भान।

नववर्षाचे।
दिन सौख्याचे।
तेवीं साचे।

स्फुरवो तव आयुष्यांत। नव आशांचें मधुगीत॥

---

# पहिली तारीख

ग्रं. ११८५ १८/१/८८

——:०:——

पत्नी—नव महिन्याची तारिख पहिली आज गडे येत ।
आनंदानें अन् हौसेनें हृदय भरुनि जात ॥

पतीः—जुन्या बिलांची स्मृती टोंचणी परि चिन्ता लावी ।
नव्या मागण्या नव पत्नीच्या पुरवाव्या केवीं ॥
या महिन्याला पातळ हिरवें गोदेसम घ्यावें ।
केव्हांची मम हौस मनाची हिरवें नेसावें ॥
सोनसळी मज रास्ता घ्यावा धारी जरतारी ।
केव्हांची मम हौस मनाला गंडेरी पदरी ॥
अशीच कांहीं सदा मागणी नवी नवी येई ।
शक्य नसे तव हौस मनाची फिटणें केव्हांही ॥

पत्नी—पुरे गडे मज नकोच कांहीं हौसेचें लेणें ।
नकोच कुरकुर, मजसाठीं मी असे काय सजणें ? ॥
गत महिन्याला होता बाई विमा भरायाचा ।
या महिन्याला निघेल कांहीं मार्गहि खर्चाचा ॥
लोणकढी जरि द्यायाची तरि द्यावी ठेवून ।
साक्षरता परि तव पत्नीची गेलां विसरून ॥
नव्या सुटाची रसीट घ्यावी अन् हॉटेलाची ।
लोणकढी मग मनांत जिरली चालू महिन्याची ॥

वसुंधरा—१०-२-३४

---

# प्रियतमास


——:०:——

( ' परिटाची क्षमा मागायची गरज काय ? ' )

प्रियतमा येशिल कधि परतून ।
वाट पाहुनी दमलें आतां जात चहाहि निवून ॥धृ०॥
परटाकडच्या नव्या सुटाची । धूळधाण उडवून ॥
शर्टाच्या तव बटनांमधुनी । दोनचार हरवून ॥
' पॅन्टी 'वरती सडकेवरची । खडी छान उठवून ॥
कोर्टीवरती[1] कोट काढितां । फाउंटन् पेन् हरवून ॥
काशिदाचिन्हित हातरुमाला । मित्रगृहीं विसरून ॥
हॉटेलावरि हल्ला करुनी । मित्रसंघ जमवून ॥
पत्रांमधल्या[2] नव्या बातम्या । चर्चेला लावून ॥
लोकांच्या ' अंतःस्थ ' बातम्या । उघड्यावर फेंकून ॥
फोनोवरची[3] प्लेट थांबता । तान छान घेऊन ॥
ठोके नउ कानांवरि पडतां । मोठ्यानें दचकून ॥
लगबगिनें मग बील चुकवितां । पाकीटचि विसरून ॥
खिसा रिकामा हलका करुनी । पोट तट्ट फुगवून ॥
जेवण न रुचे म्हणुनी द्याया । लोणकढी जुळवून ॥

---

१. टेनिसकोर्ट. २. वर्तमानपत्र. ३. हॉटेलांतून फोनो ठेवण्याची नवी पद्धत तिला उद्देशून.



धाडधाड मग जिना चढुनियां । पायऱ्यांस गाळून ।
'वाट पाहतें अहा कधींची । वेणी हातिं धरून ॥
आणिलीत मज रिबन गुलाबी । वाटे खास विणून' ॥
रागाचा मग कण्हेरें फुलवा । रिक्त खिसा दावून ॥

विविधवृत्त ३-९-३२.

---

४. अनुरागाचा जर गुलाब तर रागाचा कण्हेर कां म्हणूं नये?

# प्रीतीस जागवाया

( तूं बोलल्या विना मी— )

तीरावरून एका, सुटती अनेक नौका ।
ध्येयार्थ एक खास, पथ भिन्नभिन्न देखा ॥

संसारसागरांत नौकेस वल्हवीत ।
हे भिन्नभिन्न मार्गें दूरस्थ जीव जात ॥

खेळावयास खेळ आहे कुणास वेळ ।
नाहीं तुलाहि वेळ नाहीं मलाहि वेळ ॥ ध्रु ॥

लाटेवरून लाट पसरून हो सपाट ।
आंदोलनें तयाचीं नौकेस झोंक देत ॥

गेली विरून लाट स्मृतिरूप मात्र होई ।
झोंक्यावरील नौका डुलतीच कैंवि राही ॥

घालावयासि मेळ आहे कुणास वेळ ॥ नाहीं तुलाहि– ॥

पूर्वांगणीं नभाच्या उधळी उषा गुलाल ।
तो रंग लाल लाल करि सागरासि लाल ।

जेव्हां तुझ्या यशाची फांके प्रभा जगांत ।
मी जागत्या मनानें गाई प्रभातगीत ॥

उकलावयास कोडें आहे कुणास वेळ ॥ नाहीं तुलाहि–॥

ये चंद्रमा नभांत प्रतिबिंब सागरांत ।
नवचंद्रिकासुधेंत नौकाहि होत स्नात ॥

तेंवीहि स्नेहभाव उपजेल जें मनांत ।
विश्वांतरांत खास स्फुरवील स्नेहज्योत ॥

परि पाहण्यास शोभा आहे कुणास वेळ ॥ नाहीं तुलाहि—॥

अज्ञात-ध्येय-बिंदू दृष्टीस ओढ लावी ॥
फिरवावया सुकाणूं कर गुंतुनीच ठेवी ॥

त्वत्स्नेह आठवोनी नेत्रांत येइ झांक ।
ऐकावयास तूंतें जाईल काय हांक ॥

स्नेहास ही भुकेली स्मृतिरूप तीळ घेतां ।
आंदोलनें मनांचीं फुलवीत शब्द-कांटा ॥

धाडीत तीळगूळ जरि ना कुणासि वेळ ।
प्रीतीस जागवाया लागे न काळ वेळ ॥

त्रिकाळ—१५-१-२७

# फीत-फुलोरा

———:०:———

जातां जातां नीलनभावरि रंगवितो मित्र ।
निजकिरणांनीं संध्याहृदयीं नव आशाचित्र ॥
रजनीचा परि पडदा पडतां लोपे त्या मागें ।
पुन्हां कशीं तें सांगा रसिका होइल का जागें ॥

\+ + + +

बालहृदय तें कौमार्याचा पडदा सारोनी ।
पहात होतें यौवनदेशीं उत्सुकशा नयनीं ॥
कोमल पुष्पें सहजमनोहर ऐशीं गुंफावीं ।
रसिकाहातीं दुग्धशर्करासंगमसम व्हावीं ॥
सभ्यजनांची असभ्य भाषा नुमजे हृदयाला ।
अल्लड बाला परिचित नव्हती नीतिबंधनाला ॥
यौवनदृष्टी नूतन रंगें सृष्टीतें खुलवी ।
नवी भावना अपूर्व आशा हृदयातें झुलवी ॥
शोधित होतें चित्त चहुंकडे काय परी नकळे ।
आस कशाची जीवा लागे कोडें पडलेलें ॥
जीवाची ती अस्फुट हुरहुर मूकत्वें राही ।
नाद तियेचा अल्लड चित्ता ऐकूं नच जाई ॥
नवसृष्टीच्या उच्छृंखलशा आनंदीं सारें ।
चित्त विचारें गुंगुनि मेलें हृदयातें विसरे ॥
नवयुवकांची कामुक दृष्टी चित्तातें रमवी ।
शब्द तयांचे अर्थहीन परि हृदयामधिं जमवी ॥
तारुण्याची मुग्ध अपेक्षा नव आनंदांत ।
नाचत होती उन्मादानें पडली तिज भ्रान्त ॥
'पुष्प असें हें सुकुनी जावें कुणि वा चुरडावें ।
हा दैवा तरि रसिका-हृदयीं कां नच विलसावें' ॥

गोड शब्द ते गोड भावना मनीं जागवीत ।
मूर्तीची स्थापना जाहली हृदयमंदिरांत ॥
वीणेची जणुं तान घुमावी, कोंडुनि ठेवावी ।
तबकडीवरी, फिरून फिरून ती लावुनि * ऐकावी ॥
तेवीं बाला गोड बोल ते मनीं सांठवीत ।
आशेची मग वेल बहरली हृदयवाटिकेंत ॥
फुलांफुलांच्या सोबासालीं प्रीतीची गांठ ।
दिसादिसाचा परिचय बांधी आशेची मोट ॥
' कशास वससी कुजट अशा या वातावरणांत ' ।
सवाल ऐसा तरुणाचा तिज करि रोमांचीत ॥
' घाणीची मज नसेच आवड शुद्ध हवेमाजी ।
हात धरोनी न्यावयास तूं असशी कां राजी ॥
होती माता अशीच कोणी पितृहीन पोर ।
नांव पित्याचें मजलागीं मग कैसें कळणार ॥
मातृसिद्ध मम जन्म असा हा होशी काय पिता ।
मम बाळाचा सांग उगा कां माना डोलवितां ' ॥
नजर रोखुनी उभी ठाकली जणुं प्रश्नचिन्ह ।
अभिमानाचें तेज सांडलें मुखकांतीवरून ॥
शिष्ट लाजले अधोमुखानें वळले माघारी ।
कुलीनतेच्या डोलाऱ्याची बाला कींव करी ॥
बुडत्याला आधार द्यावया कर न पुढें येई ।
बोल फुकाचे कींव फुकाची उधळाया घाई ॥
आशेची अन् विश्वासाची सुटतां मग गांठ ।
आयुष्याचा फीत-फुलोरा × लोंबे विस्कळित ॥

कला—वर्ष २—अंक ८—९.

---

* फोनोवर लावून × रिबनचा बो.

# भावाचा ठसा

—:०:—

हृदयाचीं गीतें, गाउनि मनास रिझवीतें ॥
कल्पना एकली बैसे मनिं उदासीन होवोनी ।
हृदयाचा फलक करोनी ठेविला पुढें पसरोनी ।
काढावें काय कळेना, हेतुही जाय विसरोनी ।

मन भांबावुनियां गेलें ।
तैं अश्रुबिंदु ते आले ।
फलकावरि मग अवतरले ।
उमटला ठसा भावाचा ॥ १ ॥

यापरी स्तब्ध ती बैसे, क्षणएक वरी मग शांती ।
आवरोनि शोकावेगा, अश्रूही पुशिले हस्तीं ।
घेतांच करीं फलकातें, आश्चर्य दाटलें चित्तीं ।

कोरियली कोण्णी मूर्ती ।
काव्याची अभिनव स्फूर्ती ।
कीं प्रीतितपाची पूर्ती ।
उमटला ठसा भावाचा ॥ २ ॥

चित्ताच्या चित्तामध्यें मूर्ती जी विहरत होती ।
न कळतां अश्रुबिंदूंनीं काढियली फलकावरती ।
हृदयाची चोरी फुटली आरक्त होय मुखकांती ।

लज्जान्वित दृष्टी खालीं ।
हास्याची कलिका फुलली ।
चमकलीं मौक्तिकें भालीं ।
उमटला ठसा भावाचा ॥ ३ ॥

संजीवनी–१२–१०–३३

———

# मज हवी ग गोरीपान ! !

पत्नी छान । मज हवी ग गोरीपान ॥ ध्रु० ॥

वधू सांवळी तरि मज नाहीं ।
यंदां लग्न करायचें ताई ।
परिस्थितीची मुळिं ना घाई ।

पत्नी छान । मज हवी ग गोरीपान ॥ १ ॥

स्वयंपाक जरि तिज ना येई ।
हॉटेलांतिल प्लेटीवरही ।
भूक शमवुनी सुखीच राही ।

पत्नी छान । जरि मिळेल गोरीपान ॥ २ ॥

सुशिक्षित तरी नको सांवळी ।
अशिक्षितहि वा असो बावळी ।
त्याची पर्वा मजला न मुळीं ।

जरि का छान । वधु असेल गोरीपान ॥ ३ ॥

पैशाची ना मजला हांव ।
हुंड्यावरती चढवा भाव ।
अशा विचारा नाहीं वाव ।

जरि का छान । वधु असेल गोरीपान ॥ ४ ॥

खेड्यांतिल जरि साधी बाला ।
फॅशन सारी शिकविन तिजला ।
कशी असो प्रिय होइल मजला ।

जरि का छान । वधु मिळेल गोरीपान ॥ ५ ॥

भांडकुदळ ती जरि का असली ।
रागाची गालावर लाली ।
फुलविल प्रणयाची मम वल्ली ।
जरि का छान । वधु असेल गोरीपान ॥ ६ ॥

गाण्याची जरि तिज ना गोडी ।
ललित-कलांची नसे आवडी ॥
ज्ञानाविषयीं मनीं दृढ अढी ।
तरी मज मान्य । जरि असेल गोरीपान ॥ ७ ॥

वाङ्मयप्रान्तीं विहार करतां ।
काव्याची माधुरी चाखितां ।
पेपरमिंट* जरि मागे कांता ।
लहान तरि मान्य । जरि असेल गोरीपान ॥ ८ ॥

प्रेमाची तिज नसे अपेक्षा ।
कर्तव्याची करी उपेक्षा ।
आलस्याची घेई दीक्षा ।
तरी मज मान्य। जरि असेल गोरीपान ॥ ९ ॥

काळा रंग नको तो मजला ।
जरि सद्गुण रत्नांनीं सजला ।
विद्यादीपें जरी उजळिला ।
तरी नच मान्य । मज हवीच गोरीपान ॥ १० ॥

* 'सत्तेच्या गुलामां'तील

सशक्त तरिही काळी नलगे ।
अशक्त गोरी जरि का बिलगे ।
भरीन डॉक्टरचेंही बिल गे ।

परि मज छान । वधु हवीच गोरीपान ॥ ११ ॥

जरि का वाला असेल गोरी ।
अन्य गुणांसी मी न विचारीं ।
आशांची थांबेल भरारी ।

ध्येय हो पूर्ण । जरि असेल गोरीपान ॥ १२ ॥

ओळख सहवासहि जरि नाहीं ।
प्रकाश उठवी फोटो पाही ।
तेवीं मम §हृत्प्लेटीवरही ।

गोरा वर्ण । ठसवीलचि मूर्ती छान ॥ १३ ॥

हृदया हृदयाचा ना मेळ ।
अंधचि कोशिंबिरिचा खेळ ।
खेळिन हर्षें सांजसकाळ ।

जरि कां छान । वधु असेल गोरीपान ॥ १४ ॥

पत्नी छान । मज हवी ग गोरीपान ॥ धृ० ॥

महिला—ऑगस्ट १९३४

---

§ फोनोची नव्हे ' निगेटिव्ह '

# मनाचें गीत

—:o:—

गावूं कैसें गीत मनाचें शब्दाच्या तालें ।
ताल विसरतां चाल अडे मग मूकपणा त्यालें ।
हृदयांतुनि ज्या लहरी येती नांव काय द्यावें ।
नामकरण तें कुणीं करावें कोणासी ठावें ।
उदासवाणें हृदय रिझविण्या गावें जरि गीत ।
उदासीनता गानीं उतरे उदास करि चित्त ।
कोमलतेचे तुषार वेडे हृदयांतुनि उडती ।
उदासीनतास्पर्शें मग ते शब्दरूप होती ।
गाणें त्यांतें कसें म्हणावें रडगाणेंच असे ।
स्वातंत्र्याच्या होळीमध्यें गाना कोण पुसे ।
स्वातंत्र्याच्या नभोमंडळीं रमती निःश्वास ।
धरावयातें तयां पसरले शब्दांचे पाश ।
गांठी मारुनि गणमात्रांच्या वंदिवान केले ।
कौशल्याचें कार्य म्हणोनी जगता दाखविलें ।
सांगा रसिकां, काव्य हेंच का तुम्हिच करा न्याय ।
खाटिकखाना पाहुनि डुलणें रसिकताचि काय ।

महाराष्ट्र-सारस्वत, मार्च—एप्रील १९३७

# माझ्या हृदयाची रमणी !

मराठी ... संग्र ... सं. ... नं. ... ता. ...

---

दिसेल का हो कोठें मजला प्रेमाची खाणी ।
माझ्या हृदयाची रमणी ॥

नभांतरीं ही असे उदेली चंद्राची कोर ।
वळत्या संध्येचा अधर ॥

सस्मित भासे वदेल परि का हास्याची खाणी ।
माझ्या हृदयाची रमणी ॥

दिशांतरीं हा असे उधळला रंग लाल लाल ।
पश्चिम—रमणीचे गाल ॥

लज्जित भासे दाविल परि का लज्जेची खूण ।
माझ्या प्रेमाची खूण ॥

सोनेरी या पदराखालीं मेघांची माला ।
लपवी कोण्या बालेला ॥

कोपयुक्त वा उभी राहिली कुणी पाठमोरी ।
सांवरी पदराहि सोनेरी ॥

खट्याळ परि तो मारुत येतां उडविल कीं पदर ।
होतसे मग नजरानजर ॥

सरोष दिसतो परी हंसवितो तुझिया नयनांस ।
माझा अनुरागचि खास ॥

कुणी तारका म्हणोत परि या प्रेमाच्या खाणी ।
दाविती हृदयाची रमणी ॥

नयनोंवालि या नभीं पातल्या पदर कुठें गेला ।
सारा अंधारचि झाला ॥

क्षणैक ढळतां नजर निसटली प्रेमाची बाला ।
शोधूं कोठें मी तिजला ॥

वेड्यासम हा असा भटकतों दावा मज कोणी ।
माझ्या हृदयाची रमणी ॥

संजीवनी-वर्ष १, अंक ९.

---

१ नेत्रांच्या पंक्ती ( तारका ).

# मुग्ध प्रेम

———:o———

१

वनांतील ती साधी बाला वनीं सदा ती राही ।
जगांतील या रीती भाती ठाव्या नच तिज कांहीं ।
निसर्गासवें खेळ खेळुनी बाल्य तिचें तें गेलें ।
मुग्ध मनाचें मुकें मुग्धपण यौवनस्पर्शें धालें ।
तारुण्याची अधीरवाणी बालकल्पना सान्या ।
आशारंगें चित्रित झाल्या रंगचि त्यांचा न्यारा ।
हास्य मुखावरि मुग्धपणाचें रसिकत्वाची खूण ।
छटा मिळाल्या एके ठायीं अपूर्वताची पूर्ण ।
वनांतरींच्या लतांसवें ती साधीभोळी राही ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ॥

२

सुगंधपुष्पीं भ्रमर गुंजतां हर्षें वेडी होई ।
प्रीतिरसाच्या गुजगोष्टींमाधिं बाला डुंबत राही ।
तृणपुष्पांचीं प्रफुल्ल वदनें प्रतिबिंबाति तद्हृदयीं ।
हास्य दृष्टि त्यांवरी फेंकुनी स्तंभितचित्ता होई ।
स्वार्थाची ती प्रेमळ दृष्टी गुलाबकंटक वृत्ती ।
संशयभक्ती या जगताची तिजसि ठाउकी नव्हती ।
आलिकुसुमांच्या प्रीतिसंगमीं साधी भोळी राही ।
/ जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

३

यापरि असतां निसर्गसन्निध चमत्कार ती पाही ।
नवयुवकांच्या मधुरवचांसी हृदयमंजरी वाही ।
एक ठाउका गुंजारव तिज भ्रमरजनांचा बोल ।
बोल तरी युवकाचा कां नच वाटे अमृतमोल ।
खुळी पोर ती स्त्रीदाक्षिण्या प्रीतिरूपची देई ।
माधुर्यीं संस्कृती न देखे प्रेमांधा मग होई ।
वनांतील ती साधी बाला वनामधें ती राही ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

४

अतृप्त नयनीं मधुरवचांसी हृदयीं दडवी खोल ।
कधीं ठाउकी नव्हती तिजला कापट्याची बोल ।
दिव्यप्रेमाच्या ज्या लहरी हृदयीं खळबळ करिती ।
आवरितां त्या महत्प्रयासें आरक्ता होई ती ।
सौंदर्याचें पान करावें इतुकें रसिकां ठावें ।
मुग्धप्रेमें मग युवकाचें कैसें मन मोहावें ।
वनांतरींच्या लतांसवें ती साधी भोळी राही ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

५

सूर्यास्ताची वेळ जाहली आरक्ता हो अवनी ।
विहगकूजनें नवी चेतना येई त्या शांत वनीं ।
पारिजातकासभोंवतींच्या पुष्पलताही फुलल्या ।

शिलातलावरि बसे एकली आमुची प्रणयी बाला ।
वेडी दृष्टी प्रेमरसानें नाचे चौंहिकडेही ।
नवी भावना हृदयीं उमटे रक्तकपोला होई ।
अलिकुसुमांच्या प्रीतिसंगमीं साधी भोळी राही ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

६

मुक्या मनाची अमूर्त आशा मूर्तत्वातें येई ।
तोंच निराशा–निर्दय–घातें मूर्च्छितचित्ता होई ।
अवमानोनी प्रीतिलतेतें गेला युवक निघोनी ।
हृदय फुलविलें मधुवचनें हें स्वप्नींही नच आणी
भोळी बाला 'वियोग' शब्दा अनोळखी ती होती ।
सदा गुंजती भ्रमरतती त्या वनपुष्पांच्या भंवतीं ।
वनांतील ती साधी बाला वनदृष्टीनें पाही ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

७

वाट पाहतां रजनी आली बाला तेथेंचि बसे ।
विलोलदृष्टी चहूंकडेही तशीच फेंकीत असे ।
नभीं चंद्रमा सुधारसाच्या धारा खालीं ओती ।
दंवरूपानें प्रभातसमयीं मोतीं त्यांचीं होतीं ।
मुग्ध हृदय तें प्रेमाश्रूंच्या धारा खालीं ओती ।
अश्रुरूप तीं रक्तकपोलीं होतीं माणिकमोतीं ।
प्रेमनिराशा काव्यगायनीं ओतावी तरि बाई ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

८

सूर्यास्तीं त्या मुग्ध कमलिनी नित्य वालिका पाही ।
म्लानवदन होवोनी दुःखा ढाळिति प्रेमाश्रूंही ।
वनपुष्पेंही मुकीं बिचारीं वनीं सुकोनी जाती ।
तीस ठाउकी प्रीतिलतेची हीच एकली जाती ।
प्रेमदर्शना शब्दें करुनी प्रियकरमन मोहावें ।
प्रेमनिराशा द्वेषा जन्मवि हें नच तिजला ठावें ।
प्रेमाश्रूंतें ढाळित ढाळित वनीं सुकोनी जाई ।
जगांतील या रीतीभाती ठाव्या नच तिज कांहीं ।

९

वनांतील ती साधी बाला प्रेमा जीवन वाही ।
मृत्यूसी धीरत्वें वरुनी अमर होउनी राही ।
देह जाय परि प्रेमभावना वनीं सदा ती खेळे ।
वाऱ्यावरती मुरलीनादें नाचति गायनमेळे ।
अद्भुत ऐशा गानरवानें सृष्टी भरुनी जाई ।
अश्रुसिंचनें प्रीतिदेवता स्मृती सदा ती देई ।
ऐकायाचें जरी कुणातें तयास तयास ऐकूं जाई ।
जगांतील जो रीतीभाती साऱ्या विसरुनि जाई ।

हिंद महिला.

# मौन : :

—:०:—

गाणें गायाचा मजशीं ।
उगाच आग्रह कां करिशी ॥ धृ० ॥
गाण्याचें तुज वेड जडे । गाऊं कैसें सांग गडे ।
हृदयभाव मम अव्यक्त । होतिल कैसे हे व्यक्त ।
गतकालाची । खळबळ साची । या जीवाची ।
वरी शांतता अहर्निशीं ।
उगाच आग्रह कां करिशी ॥ १ ॥
गतकालाची गिरिबाला । निघे जिंकण्या विश्वाला ॥
नवेपणाची हौस तिला । अनुभव नाहीं हृदयाला ॥
उथळ मनाची ती पोर । उच्छृंखळही असणार ॥
सवेग धांवे । सदा अनुभवे । भाव नवनवे ।
जें जें हृदयीं बिंब पडे ।
त्याचें पडलें तिज कोडें ॥ २ ॥
इकडे आज उद्यां तिकडे । अहंपणा मग कुठुनि जडे ॥
ज्यांच्यासंगें ती जाई । तद्रूपचि होउनि राही ॥
आज उद्यांचें भान नसे । सदा सारखी खेळतसे ॥
वायूसंगें । घाली पिंगे । त्यांतचि रंगे ।
हास्याच्या लहरीवरती ।
अस्फुट बोलांची भरती ॥ ३ ॥
कांठाच्या हिरवळीसवें । लपंडाव मग खेळावे ॥
झुडुपाआडुनि छपत निघे । खडकासी येउनि बिलगे ।
हिरवी सृष्टी घाबरली । हास्याची उकळी फुटली ।
हृदय हालले । गाल फुलविले । हास्य पसरलें ।

तुषार उडती दूरवरी ।
छाया पांडुरकी पसरी ॥ ४ ॥

दूर राहिलें बालपण । उभें ठाकलें तारुण्य ॥
पर्वा परि तिजला नाहीं । दिक्कालाची जाणिव ही ॥
अल्लड आनंदें धुंद । होय गती थोडी मंद ॥
तारुण्याचा । मद नयनाचा । उतरायाचा ।
नसे परी तिजला ठावें ।
बिनदिक्कत पुढती धांवे ॥ ५ ॥

हिरवी सृष्टि कांठाशीं । कुरवाळी प्रेमें तिजशीं ॥
नसे परी तिजला वेळ । खेळाया अल्लड खेळ ॥
बालबोल विसरी सारे । नवीन गाणें आंत स्फुरे ॥
बोल तयाचे । खोलचि साचे । ऐकायाचे ।
तरि विसरा सर्वहि भान ।
हृदयाचे करुनी कान ॥ ६ ॥

वारा वाहे मंदगती । लहरी गालांच्या वरती ॥
झाडाचें जरि पान झडे । गालावरती खळी पडे ॥
गान परी तें हृदयाचें । असे सतत चालायाचें ॥
येथें तेथें । नजर न होते । पुढें चालतें ।
ध्येयाची हृदया आस ।
असे लागली कीं खास ॥ ७ ॥

विचारमग्ना चालतसे । गानासी परि खंड नसे ॥
सदा चंद्रमा गगनींचा । हृदयीं झोके घ्यायाचा ॥
झाडाझुडुपांच्या छाया । विंबायाच्या हृदयीं या ॥
वाऱ्यावरती । लहरी स्फुरती । गाणें गाती ।
सहजाचि सारें होत असे ।
तिचें तिलाही कळत नसे ॥ ८ ॥

तोरा परि तारुण्याचा । वाढत होता हृदयाचा ॥
वेगानें बहु ती धांवे । सृष्टी आश्चर्याचि पावे ।
गाणें गाई मोठ्यानें । तारुण्याच्या ताठ्यानें ॥
कडा संपला । मार्गहि नुरला । पतन पावला ।
एकाएकीं ओघ सरे ।
ओठांतिल ओठांत उरे ॥ ९ ॥

चहूं बाजुनीं उंच कडे । सभोंवार मोठीं झाडें ॥
छाया त्यांची हृदयांत । पडे परी राही शांत ॥
हृदयासी ये मूकपणा । कांहीं केल्या गाईना ॥
वायूसंगें । घाली पिंगे । त्यांतचि रंगे ।
गतकालाचें हें गाणें ।
आतां विसरुनियां जाणें ॥ १० ॥

रवी तळपला आकाशीं । काळोखातें जरि नाशी ।
किरण तयाचे सोनेरी । हृदयातें मम पुनित करी ।
गान जरी ते स्फुरवीत । होणें नच आतां व्यक्त ॥
अनुभव खोली । फार जाहली । खचुनी भरली ।
कसे बुडबुडे वर यावे ।
गाणें कैसें मी गावें ॥ ११ ॥

भावांची गर्दी जाण । वाचेतें मग मूकपण ॥
हृदयासी येई खोली । गाण्याची गोडी गेली ॥
भूकंप जरी होईल । बांध फुटोनी जाईल ॥
पुनरपि गाणें । गात धांवणें । खेळ खेळणें ।
अल्लडतेचें बाळपण ।
येइल परि कां परतून ? ॥ १२ ॥

## ' वसुंधरा–वस्त्रहरण '

———:०:———

सहस्ररश्मी मेघांच्यासह द्यूत खेळतां नां।
मेघराज तो कपटद्यूतें हरवितसे त्या ला ॥
वसुंधरेसी पणा लाविलें मित्रानें अंतीं।
तीतें जिंकी मेघराज तो झाला दुष्टमती ॥
आज्ञा करि मग ' शीतल देवा ' आणाया तिजला।
मेघ गर्जना करुनी बोले आण त्वरित तिजला ॥
शब्द ऐकुनी वीज चमकली तारापथ नयनीं।
हतबल परि तो स्वस्थ राहि जरि क्रोधाग्नी स्वमनीं ॥
विवस्त्र करण्या वसुंधरेतें सभेमाजि नेई।
शीतल, परि ती वसंतबंधू आठविते हृदयीं ॥
वसंतदादा येई येई तव भगिनी रक्षीं।
बंधूविण नच दुजा तारिता मजला अनुलक्षीं ॥
हतबल पति मग कपटद्यूतें हरिलें दुष्टानें।
अभिमानें ते मजला नेती दासीसम जाणें ॥
दादा, सांगे तव भगिनी ही दासीकाम करी।
येई धांवत राखाया मम लज्जा आज तरी ॥
विवस्त्र करितो शीतल मजला धांव धांव आतां।
वसंत धांवे भगिनी—बोला ऐकुनियां त्राता ॥
वस्त्र नेसवी तिज कुसुमांचें कोमल पल्लव ते।
पहा शोभती शालूवरि त्या चकित करी त्यांतें।
आज्ञा देतां मारुतास कीं पळे मेघराज।
वसुंधरेच्या घरीं होतसे आज भाउबीज ॥

प्राविण्य

# विमा ! !

—:o:—

चिंताजड तव अधोदृष्टि अन् निःश्वासहि टाकणें ।
खास हीं विरहाचीं लक्षणें ॥

हास्यपुष्प तव मुखावरिल कीं कोमेजुनि चाललें ।
जाळें आंठ्यांचें पसरलें ।

'विमा' कोणही आग लाविते सांग तुझ्या अंतरा ।
आटवी आनंदाचा झरा ॥

चमकणें घडिघडी सांग सख्या कासया ।

झोंपेंत दचकणें 'विमा, विमा' म्हणुनियां' ।

'कां उगाच शंका ? तुजविण ना मम प्रिया ॥




घडते तारिख आज विम्याची पहिली तारिख उद्यां ।
कल्पना हीच एक तापदा ' ॥

प्राविण्य—मे १९३४

# शकुंतलेचें प्रत्युत्तर

———×———

आजवरी तव औदार्याच्या गोष्टी ऐकोनी ।
मोहित होतें आज परी तव आलें मन कळुनी ।
मंजु भाषणें थोरहि वचनें सारीं तीं खोटीं ।
आजचि सारें कळुनी आलें सृष्टी उफराटी ।
स्त्रीहृदयाचें सार अर्पिलें जिनें बालभावें ।
स्वीकारोनी पुन्हां तियेला कां अपमानावें ।
राजधर्म का पुरुषत्वाचें लक्षण हें काय ।
आर्यत्वाचें ब्रीद हेंच वा कुलधर्माचि हाय ! ।
विनययुक्त या आर्यकन्यका मूक अधोवदना ।
पतीदेवता पूजिति म्हणुनी काय बुद्धिहीना ? ।
अबला परि हो तिच्याविना तें गृहही कांतार ।
निंदाया त्यां पुरुषत्वाचा एकचि अधिकार ।
धर्माधर्मी निर्णय द्याया तुम्हीच महशूर ।
स्त्रिया बिचाऱ्या पुरुषापुढती मान लवविणार ।
'परभृत' शब्दें जन्मकथा मम लक्षिसि उपहासें
पौरुष माझें, जन्म परी तो दैवाधीन असे ।
धिक्कारोनी मला धाडिसी दूषण ठेवून ।
दूषित नच मज त्वत्कीर्ती परि केलीसे मलिन ।
असो कशाला उगाच दुखवूं चित्त शब्दजालें ।
होणें सर्वहि होउनि गेलें सत्य पुढें आलें ।
क्षमा असावी जरी बोलिलें कर्णकटू बोल ।
अभिमानाविण आर्यकुलींचा जन्म असे फोल ।

———

# शाळेतील मौज

———:o:———

दहा ठोके वाजले घड्याळांत । उशिर होतां भयभीत होय चित्त ॥
उभे पंतोजी छडीसहित दारीं । चित्र ऐसें त्रासवी मना भारी ॥
झणीं घेऊनी करीं दप्तरासी । पदीं घालोनी जुन्या वाहणांसी ॥
एक तुटकी निसटली घालतांच । दुजी घालोनी जाय त्वरें साच ॥
मनीं चिंता थैमान करित होती । विचारेंही नेत्रांत अश्रु येती ॥
बुडे घंटा मारही तो मिळेल । रँक वरचीही खालतीं ढळेल ॥
थेट गंगा भेटण्या यमूनेस । वेणिसंगम तें होय तेथ खास ॥
झणीं बाहीनें अश्रु ते पुसोनी । घसा केला तो साफ खांकरोनी ॥
त्वरे जातांना सुटति पुस्तकें तीं । सांवरीतांना जात अधोपंथीं ॥
झणीं उचलोनी झाडिलीहि धूळ । लोक म्हणती लागलें मला खूळ ॥
तदा वेगें धांवलों नीट पंथीं । मुलां आदळतां होय मनीं खंती ॥
'व्हेरि सॉरि' असें झणीं वदोनीयां । वाष्पवेगें धांवलों हजर व्हाया ॥
नयनपंथीं येतसे पाठशाला । कंप सुटला घामही ये तनूला ॥
श्वास टाकित पोंचलों पायरीतें । तदा गडबड येतसे द्वारपंथें ॥
स्वस्थचित्तें वर्गांत प्रवेशोनी । खेळतांना पाहिले वर्ग दोन्ही ॥
एक जागीं टाकोनि पाकिटास । झणीं गेलों त्यांसवें खेळण्यास ॥
धांवतांना पाडिले बांक सारे । चपलतेनें दिपतील तेहि तारे ॥
आरडोनी घालितां धुमाकूळ । उद्धरीलें तें डिसिप्लीनखूळ ॥
कुणी मास्तरसम शब्द काढितात । कुणी हस्तक्षेपांस दावितात ।

कुणी तोंडेंही वेडवांकुडीं तीं । दाखवोनी पोरांस हांसवीती ॥
एक घाली पायांत पाय पाडी । कुणी दुसऱ्याची करूनियां घोडी ॥
धांवती ते मारिती उड्या कांहीं । हांसहांसोनी दमति मुलें पाहीं ॥
कुणी कुस्त्यांशी मारितात धीट । कुणी उलटे राहती उभे नीट ॥
जणूं वाटे कीं सर्कसची चाले । हास्यनादें बिल्डिंग सर्व हाले ॥
झणीं कर्णीं येतसे मेघनाद । तयां वाटे तो मुलांचाच नाद ॥
सर्व करिती अनुकार निनादाचा । परी पावे स्तब्धता तीच वाचा ॥
मुलें वेगें पुस्तकें शोधितात । कळेना त्यां होईल काय तेथ ॥
तोंच बोले ती धीर क्रूर वाणी । पळालें तें तोंडचें सर्व पाणी ॥
तनू पावे कंपास मुलांची ती । घर्मधारा त्या त्वरें वाहताती ॥
कुठें गेला तो हर्ष मावळोनी । तदा बोले 'सर' ओंठ आवळोनी ॥
'मूर्ख कुठले' तैं शब्द ते जिराले । क्रोध-आवेशें ओंठही स्फुराले ॥
तदा होई कुंठीत शब्दचाल । पुढें ऐकाया सिद्ध होति बाल ।

झालें काय पुढें मुळीं न रसिकां सांगावया लागतें ।
सांगावें तरि जागृता करितसे पूर्व-स्मृती मात्र तें ॥
हास्यें निर्मलशा भरूनि उरलें जें एक पूर्वक्षणीं ।
होई शोकरसा तिथेंचि भरती वर्णू शकेना कुणी ॥

आनंद–१९२३

# शिशूस हंसतांना पाहून—

दुःखदरी खोल अती
स्वार्थी जैं जन बुडती
घालया तयांस हात
बाळ येतसे १

भीषणतिमिरांत घोर
अंध होति थोर थोर
दावया तयां प्रकाश
बाळ येतसे २

स्वार्थांचें मेघजाल
दूरी सारीत बाल
प्रेमाचा उदयकाल
जवळि येतसे ३

प्रेमाचे बोल मधुर
अस्फुट जीवननिर्झर
बालकरूपें तुषार
उंच उडतसे ४

दुःखाचें मूळ जात
आनंदीं गुंग होत
बालक आनंदरूप
हास्य हंसतसे ५

सरिता सागरविलीन
तेवीं त्या हास्यिं लीन
हृदयींचा प्रेममीन
आज होतसे ६

मायेचे तुटति बंध
होई मन प्रेमबद्ध
जगताचें चित्स्वरूप
एक दिसतसे ७

नष्ट होति सर्व भेद
न उरे हृदयांत खेद
आत्मैक्यीं मधुर नाद
कर्णीं येतसे ८

वीणा ही आत्मरूप
जीवन तारस्वरूप
अस्फुट मधुरम्य नाद
बाल हा असे ९

विविधवृत्त—खास अंक १९२८

# शेवंतीचें फूल

——:०:——

शेवंतीचें फूल पहा हें रम्य किती दिसतें ।
वायूसंगें नाचे खेळे गोड किती हंसतें ॥
सुवास यातें जरि ना येई ।
रंग परी तो मनास मोही ।
फूलपांखरूं खेळायास्तव धांवुनियां येतें ॥
सोनेरी हा रंग तयाचा पहा किती खुलतो ।
झाडाचा कीं डूल कार्णिचा डौलानें डुलतो ।
काय तारका आकाशींच्या ।
किंवा माळा या दीपांच्या ।
फुलझाडांच्या दिपवाळीचा उत्सव कीं होतो ॥
हिरव्या हिरव्या पानामागें कोण गडे लपलें ।
हिरमुसली कां कलिकाताई कारणही नकळे ६
उद्यां उगवतां तूंही फुलशिल ।
राग आजचा विसरुनि जाशिल ।
हांस गडे तूं हांस जराशी दावी मुखकमला ।
दंवबिंदूचीं तुझीं आंसवें पुसुं दे कीं मजला ।

महाराष्ट्र सारस्वत–११–१२–१९३६

# सखीच्या स्वागतार्थ

---:o:---

गतकाल दूर गेला। त्याची स्मृती मनाला ॥
हंसवील कां सखीच्या। हर्षानिलें कपोला ॥
तव गोड गोड बोल। कुरवाळिती मनाला ॥
तो स्पर्श आठवोनी। ये रक्तिमा कपोला ॥
तव गोड गोड हास्य। घुमलें गडे मनांत ॥
आंदोलनें तयाचीं। जीवास शांति देत ॥
तव गोड गोड चेष्टा। नयनीं प्रतीत झाली ॥
ती दृष्टि आठवोनी। ये घर्मबिंदु भालीं ॥
नव गोड गोड राग। जैं रंगवी मुखाला ॥
नयनांतुनी सखीच्या। गाळीत आंसवाला ॥
तो गोड गोड शोक। विरहार्थ बाहुलीच्या ॥
क्षण दुःख विस्मरोनी। हंसवी मना सखीच्या ॥
ही गोड गोड माला। गतकालिंच्या स्मृतींची ॥
तव गोड स्वागतार्थ। गुंफीत आज साची ॥
तव गोडशा गळ्यांत। घालोनि प्रेमभावें ॥
हृदयावरी रुळावी। प्रेमा न विस्मरावें ॥

महिला-वर्ष २

---

# स्वप्नतरंग

———:०———

अफाट चंदेरी दरियांतुन पोहत जाई मन ।
लाटांचीं चिमुकलींच वलयें जाती कुरवाळुन ।
गगनींची धिट्टुकली तारका हंसतां मज खुणवुन ।
उदासीनता एकलकोंडी जाई मग वितळुन ।
उत्साहानें अंग थरारे येई नवचेतना ।
फेंसाचे मग तुषार सुंदर भिडती गगनांगणा ।
चढुनी जातां तुषार-मार्गें तारा ये धांवत ।
हातामध्यें हात घालुनी वदली मज हांसत ।
“ सखे बैस ये नावेमाजी जाऊंया विहरत ” ।
अभ्राचें तिज शीड चढवितां चंद्रकोर सरकत ।
वाऱ्याच्या कीं लाटांवरती डौलानें डोलत ।
विश्वाच्या ग्रंथाचीं गेलीं पानें मग उलटत ।
तारांकित कासाराभंवतीं शैवाळी चौकट ।
पाण्यावरती पानें होतीं वाटोळीं तरंगत ।
दोन कळ्या झोंपल्या तरंगत्या हिरव्या शय्येवरी ।
आस उद्यांची फुलवित होती स्वप्नें हृदयांतरीं ।
किरणांच्या जाळींत विणुनियां दंवबिंदूंचीं फुलें ।
सुमनांच्या सृष्टीवर होतें पांघरूण टाकलें ।
तृणांकुरांच्या झोल्यामाजी झोंपवुनी तान्हुलें ।
फूलपांखरूं पहात होतें स्वप्नीं फुलतीं फुलें ।
सुटला वारा आणिक कलली नाव जरा बाजुला ।
लाटेवरची प्रतिमा हलती भेटाया ये मला ।
नाव उलटतां स्वप्न विरालें होतां मग जागृत ।
खिडकीमधुनी शुभ्र चांदणें होतें डोकावत ।

———

# सर्वस्वदान

——:०:——

विश्वाचा जगतीं असे पसरला संसार सारा जरी
देऊं काय तुला तुझेंचि, सदया, चिंता मना ही वरी ॥
आहे दीन खरी जरी मम गृहीं संपन्नता वावरे।
देशी तूंचि मला तुझेंचि तुजला देऊं कसें मी वरें ॥ १ ॥
वाहे रम्य झरा, प्रभो, तव पदीं अर्घ्यास मी देइन।
प्रेमें चंदन-गंध-मिश्रित जलें स्नानासही घालिन ॥
आहे आस परी तुझीच अचला सत्ता तयीं वावरे।
देशी तूंचि मला तुझेंचि तुजला देऊं कसें मी बरें ॥ २ ॥
उद्यानीं फुलती फुलें विहरती पर्णीहि नानापरी।
होती पक फलें प्रभो तव पदीं हीं वाहिलीं आदरीं ॥
देशी रंग तयां सुगंध, मधुता, चैतन्यही गोजिरें।
देशी तूंचि मला तुझेंचि तुजला देऊं कसें मी बरें ॥ ३ ॥
घालूं देह जरी तुझ्याच पदरीं तोही तुवां निर्मिला।
देऊं काय तुला पिसें हृदय हें बुद्धीहि वा निर्मला ॥
वाहूं प्राण तुझ्या पदीं वद प्रभो कीं सौख्य तें साजिरें।
देशी तूंचि मला तुझेंचि तुजला देऊं कसें मी बरें ॥ ४ ॥
आहे सर्व तुझें चराचर प्रभो चैतन्य तेंही जरी।
आहे जीव तुझा सदेह हृदय-वृत्तीहि ती बावरी ॥
आतां एकचि रत्न मात्र अवघें माझें असें राहिलें।
तेंही ' दुःख ', विभो, तुझ्याच चरणीं हें घे पहा वाहिलें ॥५॥

मनोरंजन

———

# साष्टांग नमस्कार

———:०:———

"काव्य तुमचें आवडे वाचकांना। शांतवीतें अस्वस्थ जनमनांना"[1]॥
स्तुती ऐकोनी कवी गार झाला। नवलें उतरे दहावेंच भूतलाला ॥१॥
"मधुर भाषा अन् कल्पनाहि गोड। सार्थ नामाची दिली असे जोड॥
शीर्षकाशीं अनुरूप चित्र साजे"। साभिमानें कविराज मनीं लाजे[2]॥२॥
"काव्य शोभे शब्दार्थ—अलंकारीं। छपाईचेंही रूप मनोहारी" ॥
असें संपादक बोलतां कवीस। दोन बोटें मग उरे स्वर्ग त्यास ॥३॥
घाइघाईनें आणि साभिमानें। कौतुकानें चाळिती कवी पानें[3] ॥
‘ कळस सोन्याचा ’ करी जाहिरात।
रेचकाची, मुर्च्छीत कवी होत ॥ ४ ॥

धन्य त्यासचि हे जाहिरातदार।
कवी घाली साष्टांग नमस्कार ॥

महिला—मे १९३५

---

१ संपादकाकडून काव्यस्तुती हें एक नवलच नव्हे काय?

२ विनयानें शरमेनें नव्हे.

३ एका पाक्षिकाच्या अंकाचीं.

४ काव्याचें नांव.

# सांत्वन

—:०:—

सुकलेलीं पुष्पें कशाला हीं फुलदाणींत ।
नष्ट भावनांची कशाला वसती वाणींत ।
पुष्पांची सृष्टी निमाली काय जगांतून ।
जाणिव जगण्याची हृदय कां जाई विसरून ।
विरल्या स्वप्नांची महती उगाच सांगावी ।
भग्न मनीषांचीं कशाला रडगाणीं गावीं ।
फुटक्या कांचांची कशाला शोधावी खाण ।
रक्तपात व्हाया असे कां कांट्यांची वाण ।
उगाच शिंपावी कशाला वठलेली वेल ।
कशास पेरावीं फुकाचीं बीजें वा फोल ।
विझल्या दीपाची बसलां घेउनियां हाय ।
ज्योतीनें ज्योत पेटणें शक्य नसे काय ।
वसंत मावळतां गळली पुष्पांची सृष्टी ।
फलभारें लवण्या देई शरदातें स्फूर्ति ।

---

# स्मृतीचें ऋण

स्मृतिचें ग गोड रीण।
फिटतां कधीं फिटेना।

हृद्यस्थ प्रेमभावा।
विटतां कधीं विटेना।

विरहांत काल जातां।
जीवास हा विसांवा।

एकाकिनी पथाचा।
आधार हाच व्हावा।

दृष्टी पुढेंच धांवे।
ध्येयार्थ सारखी ही।

परि लक्ष श्रोत्रियाचें।
मागें वळून राही।

चाहूल लागतांच।
हृदयास जाग येई।

ऋण ना फिटो कदाही।
देई मनास ग्वाही॥

नवी गृहलक्ष्मी—जुलै १९३४.

# स्मृतीचे पडसाद

——:•:——

होतें खेळत हृदय चिमुकलें गृहीं सदा एक ।
नसे काळजी नसे कशाचें त्यातें सुखदुःख ।
भिरभिर फिरणें वाऱ्यासम त्या प्रिय वाटे फार ।
एके ठायीं ठरे न पळभर लाजवील भ्रमर ।
चंचलनयना सस्मितवदना मधुवचना बाला ।
विविधतरंगें बालत्वाच्या रिझवी सकलांला ।
दुडुदुडु चाले अस्फुट बोले, हृदयीं जे ठसले ।
नाद तयाचे आज परी ना स्मृतिमात्रचि झाले ।

*   *   *   *

भीषणरूपा पूर्ण शांतता गृहीं पसरलेली ।
नष्टचेतना कलेवरासम भासे त्याकालीं ।
मंजुळ बडबड मधुरहि गडबड कोठें ती गेली ।
हाय, बालिका शुष्कशरीरा शय्येवर दिसली ।
हास्य मुखावरि तसेंच विलसे नेत्र तेच होते ।
चंचलता परि कुठें लोपली नकळे चित्तातें ।
दुडुदुडु चाले अस्फुट बोले, हृदयीं जे ठसले ।
नाद तयाचे आज परी ना स्मृतिमात्रचि झाले ।

*   *   *   *

हळुहळु मिटती नेत्र लोपलें हास्य मुखावरचें ।
काळी छाया विजयानंदें त्या ठायीं नाचे ।
संध्या गेली चंद्र येत त्या राहूनें गिळिला ।
तेविं धवलता रक्तमुखींची जाई विलयाला ।
ओठ चिमुकले हळूच हलले नयनयुग्म उघडी ।
क्षणैक पाहीं मातृमुखातें झांकि पुन्हा नुघडी ।
जातां जातां शेवटचें घे दर्शन आईचें ।
' आई ' शब्दें विकसित वाचा मिटली त्याच वचें ।

*     *     *     *

आशेचा झुलताहि बांध फुटला ती हांक ऐकोनियां ।
सौख्याच्या शिखरावरी बसविलें पूर्वी जियेनें तयां ।
गेली कांपित अंतरा चरचरा शोकार्णवीं लोटुनी ।
देई दीप प्रकाश निर्मल सदा टाकी अजी जाळुनी ।

---

# स्वार्थांचा न्याय

——:०:——

प्रीतीचीं सुमनें जगीं विखुरलीं घेती कुणी त्यांजला।
वासें मोहुनियां करीं उचलितां नेत्रांत अश्रूजला।
येई पूर बघूनि भग्नहृदयें पत्रें तया गाळितां।
कोणी पायदळीं असें तुडविलीं हा दैवनिष्ठूरता॥
दैवा निंदुनि काय हो फळ असे निष्ठूरता मानवी।
स्वार्थाची दुहिता जगांत मिरवी ही गोष्ट नाहीं नवी।
मोहें अंध बनूनि गर्वहृदयें पादें करी ताडना।
पुष्पें कोमल बापुडीं मग करी तीं मूकचीं रोदना॥
हर्षें हांसुनियां प्रकाश जगता द्यायास ज्यां निर्मिलें।
हास्यें शोभित गाल तेच सुकती कीं अश्रुच्या हो जलें।
नाहीं कीं उरली जगीं रसिकता कारुण्य कीं आटलें।
हा दैवा तरि तारतम्य विधितें नाहींच कीं राहिलें॥
देई कोमलता सुमांस जगता निष्ठूरता आसुरी।
ऐशा या अबलांस निर्मुनि विधी देई जगाच्या करीं।
तुच्छत्वें अपमान हेंच लिहिलें भालीं तयांच्या असे।
सौंदर्या उपभोगितांच त्यजणें ही स्वार्थरीती असे॥
देहा वेंचुनियां परोपकृतितें स्वार्थी जगाच्या पदीं।
आत्म्याचें बलिदान तेंहि करुनी दुःखार्णवीं बापुडी।
पुण्याचें फल अश्रुसिंचन—नव्हे साक्षात् सुधापान तें।
एकांतीं रडणेंच एक उरतें त्यांच्या करीं काय तें॥

महिला—नोव्हेंबर १९३६.

——

# संध्या

——:०:——

संध्या आली पश्चिमदेशीं परडी घेवोनी ।
सागरगोटे खेळायातें सोनेरी भरुनी ॥
पीतवसन नेसोनी सजली शेला रक्तहि तो ।
शोभा देई तन्मुखकमला गर्वातें हरितो ॥
खेळायातें बैसे बाला तोंचि चंद्र येत ।
हळुच चोरुनी लपुनी राही पार्श्वभागिं तेथ ॥
जिंकुनि सारे खडे तिचे ते उधळी उंच बळें ।
नभोमंडळीं, म्हणती त्यांना, तारे परि सगळे ॥
खडे संपले, सर्व सांडले, खिन्न मनें बाला ।
फेंकुनि वसनें दुःखाश्रूंतें ढाळितसे अबला ॥
वृक्षलतांच्या वरी अश्रु ते पुष्परूप घेती ।
हास्या करिती पूर्वजन्मिच्या दुःखा विस्मरती ॥
कितीएक ते दंव होउनियां पृथ्वीवरि येती ।
सूर्य-किरण-वारूवरि बसुनी स्वर्लोकीं जाती ॥
सृष्टीदेवी समजावी तिज तद्‌हृदयहि शोकें ।
व्याकुळ झालें बाला बघुनी व्यापियली दुःखें ।
रडवी अपुल्या लीलेनें त्या कोमल बालेला ।
निष्ठुरहृदयीं चंद्र कौतुकें करितो हास्याला ॥

नवी गृहलक्ष्मी—वर्ष १—अंक ११—१२

# स्वार्थाचा न्याय

——:०:——

प्रीतीचीं सुमनें, जगीं विखुरलीं घेती कुणी त्यांजला ।
वासें मोहुनियां करीं उचलितां नेत्रांत अश्रूजला ।
येई पूर बघूनि भग्नहृदयें पत्रें तया गाळितां ।
कोणी पायदळीं असे तुडविलीं हा दैवनिष्ठूरता ॥
दैवा निंदुनि काय हो फळ असे निष्ठूरता मानवी ।
स्वार्थाची दुहिता जगांत मिरवी ही गोष्ट नाहीं नवी ।
मोहें अंध बनूनि गर्वहृदयें पादें करी ताडना ।
पुष्पें कोमल बापुडीं मग करी तीं मूकची रोदना ॥
हर्षे हांसुनियां प्रकाश जगता द्यायास ज्यां निर्मिलें ।
हास्यें शोभित गाल तेच सुकती कीं अश्रुच्या हो जलें ।
नाहीं कीं उरली जगीं रसिकता कारुण्य कीं आटलें ।
हा दैवा तरि तारतम्य विधितें नाहींच कीं राहिलें ॥
देई कोमलता सुमांस जगता निष्ठूरता आसुरी ।
ऐशा या अबलांस निर्मुनि विधी देई जगाच्या करीं ।
तुच्छत्वें अपमान हेंच लिहिलें भालीं तयांच्या असे ।
सौंदर्या उपभोगितांच त्यजणें ही स्वार्थरीती असे ॥
देहा वेंचुनियां परोपकृतितें स्वार्थी जगाच्या पदीं ।
आत्म्याचें बलिदान तेंहि करुनी दुःखार्णवीं बापुडी ।
पुण्याचें फल अश्रुसिंचन–नव्हे साक्षात् सुधापान तें ।
एकांतीं रडणेंच एक उरतें त्यांच्या करीं काय तें ॥

महिला–नोव्हेंबर १९३६.

———

## संध्या

——:०:——

संध्या आली पश्चिमदेशीं परडी घेवोनी ।
सागरगोटे खेळायातें सोनेरी भरुनी ॥
पीतवसन नेसोनी सजली शेला रक्तहि तो ।
शोभा देई तन्मुखकमला गर्वातें हरितो ॥
खेळायातें बैसे बाला तोंचि चंद्र येत ।
हळुच चोरुनी लपुनी राही पार्श्वभागिं तेथ ॥
जिंकुनि सारे खडे तिचे ते उधळी उंच बळें ।
नभोमंडळीं, म्हणती त्यांना, तारे परि सगळे ॥
खडे संपले, सर्व सांडले, खिन्न मनें बाला ।
फेंकुनि वसनें दुःखाश्रूंतें ढाळितसे अबला ॥
वृक्षलतांच्या वरी अश्रु ते पुष्परूप घेती ।
हास्या करिती पूर्वजन्मिच्या दुःखा विस्मरती ॥
कितीएक ते दंव होउनियां पृथ्वीवरि येती ।
सूर्य-किरण-वारूवरि बसुनी स्वर्लोकीं जाती ॥
सृष्टीदेवी समजावी तिज तद्‌हृदयहि शोकें ।
व्याकुळ झालें बाला बघुनी व्यापियली दुःखें ।
रडवी अपुल्या लीलेनें त्या कोमल बालेला ।
निष्ठुरहृदयी चंद्र कौतुकें करितो हास्याला ॥

नवी गृहलक्ष्मी—वर्ष १—अंक ११—१२

# हा कोण एकला खेळे

वृंदावनिं गोपालांच्या । हा कोण एकला खेळे ॥ धृ० ॥
शांतीच्या साम्राज्यांत । रुमझुमती पदिंचे वाळे ।
वाळ्यांच्या तालावरती । गानाचे झुलती चाळे ।
निर्जनीं वनीं ऐशा या । हा कोण एकला खेळे ।

हातींची मुरली वाजे ।
कमरेशीं शेला साजे ।
वनमाला कंठिं विराजे ।
रुमझुमती पदिंचे वाळे ॥ १ ॥

नीलवर्ण राजस बाळ । रूपाची सीमा झाली ।
ओतुनी नीलकमलें का । काया ही कोमल केली ।
पदिं पदीं मुखावरि नाचे । हृदयाची मोहक लाली ।

हास्याच्या पडद्यामधुनी ।
कुंदकळ्या बसल्या दडुनी ।
लुकलुकती तारा नयनीं ।
रुमझुमती पदिंचे वाळे ॥ २ ॥

वाळ्यांच्या तालावरती मुरलीची घेई तान ।
ऐकुनी मधुर नादातें आकंठ करिति तत्पान ।

मीपणा गळाला सारा ।
प्रेमाचा सुटला वारा ।
अश्रूंच्या नयनीं धारा ।
वाहती कुणाही नकळे ॥ ३ ॥

हरपलें भान हृदयाचें । मुरलीचा ऐकुनि नाद ।
भावना जाहली जागी । जीवाची, ऐकुनि साद ।
मुरलीच्या नादामध्यें । भेदाचा जिरला वाद ।

जीवाची पटली खूण ।
जन्मांचा गेला शीण ।
कर्मांची तुटली वीण ।
रुमझुमती पदिंचे वाळे ॥ ४ ॥

राधिका त्वरेनें उठली । ऐकुनी हांक हृदयाची ।
मुरलीच्या नादें कान्हा । प्रेमाची भिक्षा याची ।
हृदयासी कळली भाषा । गानाच्या गूढत्वाची ।

सोडोनि सर्वही भाव ।
निष्काम मनें घे धांव ।
तच्चरणीं घ्याया ठाव ॥ ५ ॥

पदरजीं हृदय मग रमलें । रुमझुमती पदिंचे वाळे ॥

# विश्रांति

—:०:—

गुलाबपुष्पाचीं । झुलती फुलझाडें जेथ ।
तुळशीची कुंडी । जगविते जीव कोंपऱ्यांत ।
विद्युद्दीपांच्या । लागल्या घरोघरीं माला ।
मिणमिणते पणती । स्मृती परि होई कोणाला ।
पुनवेचा चांद । मिरवतो तारांसह गगनीं ।
शुक्राची तारा । पाहिना कुणीच ढुंकोनी ।
लाटांचा फेस । आपटे खडकाखडकाला ।
नाच सागराचा । विसरवी ओढ्याची लीला ।
भाषेचा वहर । नसे वा अभिनयही गोड ।
वाटेना गोड । जगाला जीवाची ओढ ।
धडपडतें विश्व । सारखा धडपडतो जीव ।
भपक्याच्या पाठीं । सारखी चालतसे धांव ।
झुळझुळतें पाणी । आणी मिणमिणती पणती ।
शुक्राची तारा । दमल्या जीवा विश्रांती ।

महाराष्ट्र–सारस्वत–मे–जून १९३७

ग्रंथालय
३५२८

## महात्माजींचा आशीर्वाद


शिवणकामाच्या यंत्राचा शोध लागल्यामुळें मनुष्याच्या सौख्यांत भर पडली आहे; याचें प्रत्यंतर आपले परमपूज्य पुढारी **महात्मा गांधी** यांनीं या शोधाला जे धन्यवाद दिले आहेत त्यावरून आढळून येईल. गांधीजींच्या मतें मनुष्यजातीच्या उपकारकर्ता ठरलेल्या, या यंत्राचा आपण आपल्या जीवनांत उपयोग करून घेणार नाहीं काय ?



**फाफचीं यंत्रें सुंदर, व मजबूत असतात.**

**पाफ** यंत्रावर सुबक शिवणकामाबरोबरच **कशीदा, मुरड** इत्यादि कौशल्याचीं कामेंहा होतात.

पाफचीं यंत्रें रोखीनें व हप्त्यानें मिळतात. गृहिणींना या यंत्रासारखा उपयुक्त दुसरा स्नेही नाहीं.



**सोल एजन्टस्**

**बेल आणि कंपनी, लि.**

२८०, कर्नाक रोड

Telephone मुंबई, २. Telegram

**24305** **"PFAFF"**

REFBK-0003728


# मुंबई सरकारनें टीचर्स लायब्ररीकरितां मंजूर केलेला

सौ. इंदिराबाई तेलंग यांचा

## लघुकथा-संग्रह

# " भावनेच्या छटा "

**किं. १। रुपया**

**कांहीं अभिप्राय**

' सहज-मनोहर भाषेंत चटकदार कथा लिहिण्याची हातोटी लेखिकेला चांगलीच साध्य झालेली आहे. ' विविधवृत्त. १५-११-३६

" लेखिकेची भाषा सोपी व रसपरिपोषक असल्यानें वाचक शेवट-पर्यंत गेल्या खेरीज क्वचितच राहतो. " विहार. २३-११-३६

" या कथा स्वतंत्रपणें लिहिण्यांत आल्या आहेत व वाङ्मयांतील कोणत्याही सांप्रदायाचें अनुयायित्व लेखिकेनें पत्करलेलें नाहीं हें स्पष्ट दिसतें. " नवाकाळ २६-११-३६

"लेखिकेनें हाताळलेलें तंत्र अभिनव आहे." स्वराज्य २७-१२-३५

"लेखिकेची भाषासरणीहि उच्च दर्जाची आहे." मौज १३-१-३७

"पुस्तक वाचनीय व मननीय आहे." प्रमोद २१-२-३७

"सामाजिक स्त्री-जीवनाची विविध अंगोपांगें विचारांत घेऊन त्यावर प्रकाश पाडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे." महाराष्ट्र परिचय मे १९३७

"लेखिकेची भाषा साधी असली तरी स्वाभाविक आहे." चि.-जगत् जून १९३७

" Done admirably in her first Book"
The Karnatak School. July 37

आपल्या लायब्ररींत हें पुस्तक आहे कां ?

मिळण्याचें ठिकाणः—
**कुमुद आणि कं.**
भिमराव वाडी, ठाकुरद्वार, मुंबई.

**नसल्यास आजच मागवा.**

# लक्ष्मीनारायण ओरीएन्ट स्टोअर्स

## हायक्लास टेलर्स अॅण्ड आउटफिटर्स

५१९, संढर्स्ट रोड, मुंबई नं. ४.



आमचेकडे
सर्व जातीच्या

**स्वदेशी**

**धोतरजोड्या**

कोटिंग, शर्टिंग, वुलन,
सिल्क, कॉटन
आणि
होजिअरीचा सर्व
प्रकारचा
माल माफक
भावानें मिळेल.
एकवेळ त्वरा करा
आणि
खात्री करून घ्या.

# आपण उतरलेला विमा पुरेसा आहे का?

आपल्या बायकामुलांकरितां व आपल्या उतारवयाकरितां तजवीज करून ठेवणें हें प्रत्येक इसमाचें कर्तव्य आहे. ही तजवीज साधण्याचें उत्कृष्ट साधन ह्मणजे विम्याची पॉलिसी.

आतांच आपलें बरें वाईट झाल्यास तुमच्यावर अवलंबून असणाऱ्या आप्तांच्या उदरनिर्वाहाची पूर्ण तजवीज केल्याचा आत्मविश्वास तुम्हांला वाटतो का?

**नसेल तर आतांच एक पॉलिसी घेण्गाची तजवीज करा.**

**श्री. जी. एल्, देसाई बी. ए. मॅनेजर,**

**दि बॉंबे को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि.**

**हेड ऑफिस**–९, बॅंक हाऊस लेन, फोर्ट, **मुंबई**

ह्यांना भेटल्यास किंवा लिहिल्यास, ते आपल्याला बरोबर मार्ग सुचवतील.

**कारणः**–? ? ?

(१) या कंपनींत १५० रु. पासूनच्या अल्प रकमांचे विमे उतरले जातात.
(२) विम्याचे हप्तेहि माफक असतात.
(३) ५०० रु. च्या आंतील रकमांना डॉक्टरी परीक्षा नसते.
(४) **या कंपनीचे शेअरहोल्डर्स नसल्यामुळें सर्व नफा विमेदारांतच वाटला जातो,**
(५) सरकारी पहाणी व हिशोबतपासणी असते.
(६) डायरेक्टराच्या बोर्डावर सरकारी प्रतिनिधि, को–ऑपरेटिव्ह संस्थांचे नामांकित कार्यकर्ते व **को–ऑपरेटिव्ह सोसयाट्यांचे रजिस्ट्रारसाहेब** आणि विमातज्ज्ञ आहेत.
(७) ही को-ऑपरेटिव्ह सोसायटी असल्यामुळें इतर विमा कंपन्यापेक्षां काम मिळविण्याचा खर्च फारच थोडा येतो.
(८) को-ऑपरेटिव्ह सोसायटी या नात्यानें या कंपनीला कांहीं कर माफ आहेत.
(९) वीस वर्षांच्या मुदतींत घेतलेल्या पॉलिसीच्या रकमेंत बोनसची वारंवार भर पडत गेल्यामुळें ५० टक्याची वाढ होण्याचा संभव आहे.
(१०) सोसायटीनें दुसऱ्या व्हॅल्युएशनच्या वेळीं दर वर्षी दर हजारीं पंधरा व अकरा रुपये बोनस जाहीर केला आहे.

**विमा उतरणें हें**

**पतीचें कर्तव्य पत्नीचा हक्क व मुलांची वाटणी आहे.**

**प्रतिष्ठित सद्गृहस्थानीं व को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांनीं एजन्सींसाठीं खास अर्ज करावेत. खास सवलती.**

**( मेसर्स कुळकर्णी आणि कं. चीफ ऑर्गनायझर्स. )**

# कला व जीवन

## कलेसाठीं जीवन कीं जीवनासाठीं कला ?

या वादांत आपण पडूं नये हेंच बरें. तथापि दोहोंनाही एक-मेकांची जरूरी आहे ही गोष्ट मात्र खरी.
पण त्याहीपेक्षां दोहोंनाही आमची मात्र जरूरी आहेच आहे, हें आम्ही छातीठोकपणें सांगतों.

## भरतकाम, विणकाम, शिवणकाम

या कलाकौशल्याच्या गोष्टींना लागणारें सर्व प्रकारचें उत्कृष्ट साहित्य व लहान पण उपयुक्त यंत्रें आमच्या दुकानीं माफक किंमतींत विकत मिळतात. कलाकौशल्याचे सुंदर व नावीन्यपूर्ण नमुने आमच्याकडे पहा—व कलाकौशल्य हस्तगत करण्याकरितां आमचा सल्ला मोफत घ्या.

# एम. मधुकर ॲण्ड ब्रदर्स

दादर ट्रॅमटर्मिनस मुंबई.—टे. नं. ६०६७७

## जगप्रसिद्ध "पॉफ" कंपनीचीं शिवण्याचीं यंत्रें

## रोकडीनें व हप्तेबंदीनें मिळतात.

सर्व तऱ्हेचीं शिवण्याचीं यंत्रें माफक दरांत दुरुस्त करण्यांत येतात.



सुकेशा
कुंतलतैल
(रजिस्टर्ड.)
अत्यंत केशवर्धक पण
गदीं बिनधोक, मेदूस
तिदायक व पोषक
केलव्हिन केमिकल कं.
मुंबई. ४.